Required Teacher
TUKARAM RAMA PATIL PUBLIC SCHOOL
At- Valap Village. Tal- Panvel, Dist Raigad.
Standard 3rd and 4th. All Subject
Qualification: H.S.C. Ded. With fluency in Spoken English.
Prefered by location: Near by Panvel New Panvel, Taloja.
Contact - 8879498842/ 9167427527

रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १७ ◆ अंक ३१९
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, ६ जून २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

'अलार्मिंग सिस्टीम प्रभावशाली करणार'/२
माणगावजवळ ट्रक-कार अपघातात चौघे जखमी/५
पहिल्या कसोटीसाठी इंग्लंडचा संघ जाहीर/८

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)



# समृद्धी महामार्ग राज्याच्या समृद्धीचा कॉरिडॉर

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; शेवटच्या टप्प्याचे लोकार्पण





**नाशिक : प्रतिनिधी**

बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गाचा अंतिम टप्पा सुरू होत आहे, ही महायुतीच्या सरकारसाठी अतिशय आनंदाची गोष्ट आहे. २०१४मध्ये राज्यात महायुतीचे सरकार आल्यानंतर बघितलेले स्वप्न आज या ठिकाणी पूर्ण होत आहे. समृद्धी महामार्ग हा रस्ता नाही, तर राज्याच्या समृद्धीचा कॉरिडॉर आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. ५) केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नाशिकमधील इगतपुरी ते ठाण्यातील आमणेपर्यंतच्या ७६ किमी लांबीच्या हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्गाच्या अंतिम टप्प्याचे लोकार्पण करण्यात आले. त्यानंतर ते पत्रकार परिषदेत बोलत होते.



मुख्यमंत्री फडणवीस पुढे म्हणाले की, पंतप्रधान मोदी यांनी समृद्धी महामार्गाच्या पहिल्या टप्प्याचे उद्घाटन केले होते. शेवटच्या टप्प्याचे उद्घाटन महायुतीच्या प्रतिनिधींनी केले. लवकरच वाढवण बंदरासोबत या महामार्गाला जोडणार आहोत.

या महामार्गावर मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपण करण्याच्या सूचना वन विभागाला देण्यात आलेल्या आहेत. एक हजार शेततळी तयार केली आहेत. २२ ठिकाणी सुविधा केंद्र तयार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. इलेक्ट्रॉनिक पद्धतीने टोल प्रणाली असून ६१ टोल प्लाझा आहेत. १४ किमी फायबर ऑप्टिक टाकण्यात आले आहे. हा महामार्ग अपघातमुक्त कसा होईल यासाठी प्रयत्न करत आहोत, असेही त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, ७०१ किमीचा हा देशातील आणि महाराष्ट्रातील गेम चेंजर प्रकल्प आहे. काहींना हा प्रकल्प होणार नाही, असे वाटत होत किंवा होऊ नये यासाठी प्रयत्न करत होते, परंतु हा प्रकल्प पूर्णत्वास आला आहे. या महामार्गामुळे १० जिल्हे प्रत्यक्ष आणि १४ अप्रत्यक्ष जिल्हे जोडले गेले आहेत. पूर्वी प्रवासाला १८ तास लागत होते. आता केवळ आठ तास लागणार आहेत. हा महामार्ग कृषी, पर्यटन आणि औद्योगिक विकासाला चालना देणारा ठरेल.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, समृद्धी महामार्ग मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा हा ड्रीम प्रोजेक्ट होता. सुरुवातीला या प्रकल्पाला अनेकांनी विरोध केला, पण मुख्यमंत्री असताना देवेंद्र फडणवीस यांनी प्रकल्पाला सुरुवात केली आणि शेवटही मुख्यमंत्री असताना त्यांनीच केला. असा योग फार क्वचित पहायला मिळतो.

## वाशी-मानखुर्द खाडीपुलाचे लोकार्पण

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या (एमएसआरडीसी) वतीने सायन-पनवेल महामार्गावरील ठाणे खाडी पूल क्र. ३ (वाशी-मानखुर्द) दक्षिण वाहिनीचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून झाले, तर प्रत्यक्ष सोहळा बेलापूर विधानसभा क्षेत्राच्या आमदार मंदा म्हात्रे यांच्या हस्ते झाला.

या वेळी आमदार म्हात्रे म्हणाल्या की, महाराष्ट्राला प्रगतिपथावर घेऊन जाण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकार कटिबद्ध आहे. या पुलामुळे नवी मुंबई, पनवेल, उरण आणि ठाणे परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून प्रवास जलद, सुकर आणि आरामदायी होण्यास मदत होणार आहे तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणे अधिक अधिक सुलभ होणार आहे.



### पर्यावरण दिनी महापालिका कार्यक्षेत्रात वृक्षारोपण

# पनवेल शहर स्वच्छ, सुंदर बनविण्यासाठी कटिबद्ध होऊया

## आमदार प्रशांत ठाकूर यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जागतिक पर्यावरणाचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने पनवेल महापालिकेने एक लक्ष वृक्षारोपणासाठी उचललेले पाऊल हे निश्चितच अभिनंदनीय व पनवेलच्या सौंदर्यात भर घालणारे आहे. त्यामुळे पनवेल शहर अधिकाधिक सुंदर व स्वच्छ बनविण्यासाठी आपण नागरिकांनीही कटिबद्ध व्हावे, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले.

पनवेल महापालिकेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने गुरुवारी (दि. ५) वडाळे तलावाजवळील महामार्गालगत सुमारे ४० झाडांचे रोपण करण्यात आले तसेच कापडी पिशवी विक्री केंद्र आणि पुनर्वापर प्लास्टिक व ई-वेस्ट संकलन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी आमदार प्रशांत ठाकूर बोलत होते. कापडी पिशवीसाठीची आधुनिक मशीन व ई-वेस्ट कचरा संकलन या महत्त्वाच्या बाबीही पनवेल महापालिकेने सुरू केल्या आहेत. त्याचा उपयोग पनवेलकरांनी अधिकाधिक करावा व पर्यावरणाचे रक्षण करावे, असे ते म्हणाले. (पान २ वर..)



### ११०० रोपांची लागवड

बदलत्या हवामानाचा परिणाम कमी करण्यासाठी आणि पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आयुक्त मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार पनवेल महापालिकेने व्यापक वृक्षारोपण मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेंतर्गत शहरातील विविध ठिकाणी एक लाखाहून अधिक झाडे लावण्याचा निर्धार केला आहे. याची सुरुवात पर्यावरण दिनानिमित्ताने महापालिकेच्या चारही प्रभागात ११०० झाडांचे रोपण करण्यात आले.

## निवडक

### राफेल विमानाचे महत्त्वाचे भाग भारतातच बनणार

**नवी दिल्ली** : राफेल लढाऊ विमानांसाठी लागणारे महत्त्वाचे भाग आता टाटा समूहाकडून भारतातच तयार केले जाणार आहेत. टाटा ॲडव्हान्स्ड सिस्टम्स ही राफेल लढाऊ विमान फ्यूजलेज चे उत्पादन करणार आहे. याकरिता दसॉल्ट एव्हिएशनबरोबर चार प्रॉडक्शन ट्रान्सफर करार केले असल्याची माहिती कंपनीने दिली आहे. हे उत्पादन भारतीय तसेच जागतिक बाजारपेठांसाठी केले जाणार असून यामुळे सरकारच्या 'मेक इन इंडिया' मोहिमेलाही चालना मिळणार आहे.

### उरणच्या सारडे गावातील महिलेचा सर्पदंशाने मृत्यू

**उरण** : तालुक्यातील सारडे येथील महिला



महादुबाई महादेव माळी (वय ७७) यांचा सर्पदंशाने मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. ४) घडली. त्या रात्री ८च्या सुमारास घरामध्ये एकट्या होत्या. लाईट गेली असताना घराबाहेर त्यांच्या पायाला सापाने दंश केला. मुले त्यांना उपचारासाठी उरण येथे रुग्णालयात नेत असताना रस्त्यातच त्यांचा मृत्यू झाला. त्यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

# घारापुरी बेटावर साकारणार अद्ययावत जेट्टी

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

जगप्रसिद्ध घारापुरी (एलिफंटा) बेटावरील पर्यटकांच्या वाढत्या वर्दळीचा ताण कमी करण्यासाठी शेतबंदर येथील जुन्या जेट्टीला जोडून ८८ कोटी रुपये खर्चून १० मीटर रूंदीची अद्ययावत नवीन जेट्टी उभारण्यात येणार आहे. पुरातत्व विभागाच्या मान्यतेनंतर या कामाला तातडीने सुरुवात केली जाणार आहे.

एलिफंटा या जागतिक किर्तीच्या बेटावरील काळ्या पाषाणात कोरलेल्या अद्भूत लेण्यांचा वर्ल्ड हेरिटेजमध्ये समावेश आहे. भगवान शिवाची विविध रूपे असलेल्या या लेण्या पाहण्यासाठी वर्षभरात जगभरातून सुमारे २० लाखांहून अधिक पर्यटक येथे हजेरी लावतात. यामध्ये दरवर्षी वाढ होत असली तरी पर्यटकांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांची वानवा आहे.



गेटवे ऑफ इंडिया येथून पर्यटकांना घेऊन लॉन्चेस बेटावरील शेतबंदर जेट्टीवर येतात. सध्या पर्यटकांसाठी चढ-उतार करण्यासाठी चार मीटर रूंदीची जेट्टी अस्तित्वात आहे. याच मार्गावरुन मिनीट्रेन धावत असल्याने पर्यटकांना चालण्यासाठी अरूंद जुनी जेट्टी त्रासदायक ठरत आहे तसेच या जेट्टीपासून लेण्यांच्या पायऱ्यांपर्यंत असलेल्या सुमारे एक किमी अंतरापर्यंत पर्यटकांसाठी फारशा सुविधा उपलब्ध नाहीत. या गैरसोयींमुळे दररोज बेटावर येणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांना समस्यांना सामोरे जावे लागते.

एलिफंटा बेटावर येणाऱ्या पर्यटकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाने केंद्र सरकारच्या सागरमाला योजनेतून शेतबंदर येथील जुन्या जेट्टीचे मजबूतीकरण आणि चार मीटर रूंदीची जुन्या जेट्टीला जोडून ८८ कोटी रुपये खर्चून १० मीटर रूंदीची अद्ययावत नवीन जेट्टी उभारण्याची योजना आखली आहे. रस्त्याच्या रुंदीकरणामुळे पर्यटकांना ये-जा करणे सुलभ होणार आहे.

या कामासाठी पुरातत्व विभागाच्या मंजुरीचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुरातत्व विभागाच्या मान्यतेनंतर लगेच या कामाला सुरुवात केली जाणार असल्याची माहिती महाराष्ट्र मेरिटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली.

### निवारा शेड, स्वच्छतागृह, बैठकीचीही व्यवस्था होणार

*जेट्टीपासून लेण्यांच्या पायऱ्यांपर्यंत असलेल्या सुमारे एक किमी मार्गादरम्यान पर्यटकांना उठबस करण्यासाठी निवारा शेड, बैठक व्यवस्था उभारण्यात येणार आहेत तसेच ठिकठिकाणी स्वच्छतागृहे उभारण्यात येणार आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून या नवीन जेट्टीचे काम करण्यात येणार आहे.*

# किल्ले रायगडावर आज शिवराज्याभिषेक सोहळा

**अलिबाग : प्रतिनिधी**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक व महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांच्या तारखेनुसार राज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन शुक्रवारी (दि. ६) करण्यात आले आहे. या वर्षी शिवराज्याभिषेकाला साडेतीनशे वर्ष पूर्ण झाल्याने येथील कार्यक्रमाला शिवप्रेमी नागरिकांची लाखोंच्या संख्येने उपस्थिती असणार आहे.

दरवर्षी रायगड किल्ल्यावर तारीख आणि तिथीनुसार शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो. यंदा तारखेनुसार ६ जून रोजी, तर तिथीनुसार ९ जून रोजी शिवराज्याभिषेक दिन साजरा केला जाणार आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून लाखो शिवभक्त गडावर दाखल होण्याचा शक्यता आहे. ही बाब लक्षात घेऊन रायगड जिल्हा प्रशासनाने शिवभक्तांच्या जेवणासाठी पाच हजार किलो तांदुळ आणि एक लाख



पाण्याच्या बाटल्या उपलब्ध करून दिल्या आहेत. गडावर १५ बेडचे रुग्णालय, तर पाचाड येथे पाच बेडचा अतिदक्षता विभाग कार्यान्वित करण्यात आला आहे.

गडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी पाचाड येथे दीडशे आणि गडावर दीडशे पोर्टेबल स्वच्छतागृहे बसविण्यात आली आहेत. पायरी मार्गावर ५०० लिटरच्या ५० पाण्याच्या टाक्या बसविण्यात आल्या आहेत. पाच जलशुध्दीकरण यंत्रातून या टाक्यांना पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे. याशिवाय एक लाख लिटर पाण्याच्या बाटल्या प्रशासनाकडून उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

# खोपोली शहरावर धुक्याची चादर

**खोपोली : प्रतिनिधी**

सध्या महाराष्ट्रात मोसमी पाऊस पडत असून रायगड जिल्ह्यातही पावसाची बरसात होत आहे.



त्यातच कधी ऊन, कधी पाऊस, तर कधी धुके पसरत असल्याने पर्यटन बहरले आहे. याचा खोपोलीच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या बोरघाट अर्थात खंडाळा घाटात पर्यटक आनंद घेत आहेत.

लोणावळा, खंडाळा ही थंड हवेची ठिकाणे असून या स्थळांच्या मोहात मुंबई, पुणे आदी शहरातील पर्यटक एक्स्प्रेस-वेवरून अमृतांजन ब्रिज, पिकनिक पॉईंट, वाघजाई पॉईंट येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक आनंद लुटण्यासाठी येत असतात.

पावसाळा सर्वांचाच आवडता ऋतू. उन्हाच्या उष्णतेपासून दिलासा मिळावा यासाठी सर्वचजण आतुरतेने पावसाची वाट पाहत असतात. या ऋतूतील वातावरण मनाला प्रसन्न करणारे असते. अशा वातावरणात आपला थकवा दूर होऊन मनाला आणि शरीराला एक प्रकारची सकारात्मक ऊर्जा मिळते. यासाठी अनेकजण निसर्गाच्या सानिध्यात जातात.

बोरघाट अर्थात खंडाळा घाट पर्यटकांना आकर्षित करीत असून पावसाळ्यात अनेकदा या घाटात मोठ्या प्रमाणात धुके पसरत असते. या वर्षी पावसात हे दृष्य पाहण्यासाठी पर्यटक गर्दी करत आहेत. त्यामुळे येथील छोटे हॉटेल व्यवसाय व उद्योगांना यानिमित्ताने तेजी आली आहे.

## 'आरसीबी'कडून चेंगराचेंगरीतील मृतांच्या नातेवाईकांना नुकसानभरपाई

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

बंगळुरू येथील चेंगराचेंगरीत मृत झालेल्या लोकांच्या नातेवाईकांना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) संघाने १० लाखांची नुकसानभरपाई जाहीर केली आहे. या संदर्भात त्यांनी अधिकृत सोशल मीडिया पोस्ट केली.

१८ वर्षांच्या प्रतीक्षेनंतर आयपीएलचे विजेतेपद मिळवलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचे स्वागत करण्यासाठी बुधवारी लाखोंच्या संख्येत त्यांचा चाहता वर्ग बंगळुरूच्या रस्त्यावर जमला होता, मात्र या उत्सवाला गालबोट लागले. बंगळुरूच्या एम. चिन्नास्वामी मैदानाबाहेर गर्दी आटोक्याच्या बाहेर गेली आणि चेंगराचेंगरी झाली. या चेंगराचेंगरीत ११ जणांचा मृत्यू झाला. या दुर्दैवी घटनेने आरसीबी कुटुंबाला खूप वेदना झाल्या आहेत, असे त्यांच्या निवेदनात म्हटले आहे.



**पनवेल : गणेशपुरी येथील विठ्ठल रखुमाई मंदिराचा प्राणप्रतिष्ठापना सोहळा उत्साहात झाला. या सोहळ्याला माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. सोबत भाजप उलवे नोड अध्यक्ष निलेश खारकर, धीरज ओवळेकर, शैलेश भगत, माजी उपसरपंच अमर म्हात्रे, स्वप्नील म्हात्रे, मनोहर ओवळेकर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.**

# मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी अलार्मिंग सिस्टीम प्रभावशाली करणार

## राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांची ग्वाही

**चंद्रपूर : प्रतिनिधी**

गत महिन्यात चंद्रपूर जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यात अनेक जणांचे जीव गेले आहेत, ही अतिशय दु:खद घटना असून शासनस्तरावरून याची दखल घेण्यात आली आहे. भविष्यात अशा प्रकारचे हल्ले रोखण्यासाठी अलार्मिंग सिस्टीम अधिक प्रभावशाली करणार असल्याची ग्वाही राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी दिली.



वन अकादमी येथे वनक्षेत्रातील महिलांची राष्ट्रीय परिषद 'वनशक्ती – २०२५' चे उद्घाटन करतांना ते बोलत होते. यावेळी मंचावर आमदार सर्वश्री देवराव भोंगळे, किशोर जोरगेवार, करण देवतळे, अपर मुख्य सचिव (वने) मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा वनबल प्रमुख शोमिता विश्वास, तेलंगणाच्या वनबल प्रमुख श्रीमती सुवर्णा, भारतीय वनीकरण संशोधन संस्थेच्या महासंचालक कंचनदेवी, प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) एम. श्रीनिवास राव, वनविकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक संजीव गौड, चंद्रपूरचे मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर आदी उपस्थित होते.

मानव – वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी अलार्मिंग सिस्टीम अधिक प्रभावशाली करू, असे सांगून वनमंत्री श्री. नाईक म्हणाले, यासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. सोबतच वन्यजीवांपासून शेतमालाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांना कुंपण व सोलर कुंपनाचा लाभ देण्यात येईल. वनविभाग हा एक महत्त्वाचा विभाग असून जंगलात मजबूत गाड्यांची आवश्यकता आहे. अशा गाड्या उपलब्ध करून दिल्या जातील. तसेच वनपाल, वनरक्षक, आरएफओ यांच्या स्तरावरील कर्मचाऱ्यांना स्वरक्षणासाठी हत्यारे देण्यात येतील. वनविभाग हा एक परिवार आहे. या परिवारांमध्ये सर्वांची काळजी घेण्याची वनमंत्री म्हणून आपली जबाबदारी आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावर्षी १० कोटी वृक्ष लागवडीचे उद्दिष्ट ठेवले आहे. यात वनविभाग अग्रेसर राहील. तसेच पुढील वन विभागाच्या भरतीमध्ये ५० टक्के भरती महिलांची करण्यात येईल. सध्या जिल्हास्तरावर मानद वन्यजीव रक्षक कार्यरत आहे. हे पद प्रत्येक तालुक्यात नेमण्यात येईल. तसेच महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या माध्यमातून चांगले प्रकल्प वनविभागात राबविण्यात येणार आहे. वन विभागाने तीन–चार अधिकाऱ्यांची टीम तयार करावी व वनांशी संबंधित अभ्यास करण्यासाठी त्यांना विदेशात पाठवावे. चंद्रपूरच्या योगदानातून वनांचे चांगले संरक्षण होत आहे. भद्रावती तालुक्यातील खुटवंडा प्रवेश गेट अतिशय चांगले करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

# स्वातंत्र्यानंतर ७५ वर्षांनी तुंगी गावाला मिळालेला रस्ता अवकाळीने गेला वाहून

**कर्जत : प्रतिनिधी**

भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्षे झाली तरी कर्जत तालुक्यातील अति दुर्गम भागात असलेल्या तुंगी गावाला जायला साधा रस्ता मिळाला नाही. तर या गावाला स्वातंत्र्या नंतर सत्तर वर्षांनी वीज मिळाली. या दोन्ही सुविधा खासदार श्रीरंग बारणे यांनी प्रयत्न केल्याने सुरु झाल्या. मात्र गेल्या वर्षी या रस्त्याचे डांबर वाहून गेले आणि त्यानंतर दुरुस्त केलेला हा रस्ता यंदा तर मे महिन्यात पडलेल्या अवकाळी पावसाने वाहून गेल्याने तुंगी ग्रामस्थांना पुन्हा पायपीट करण्याची वेळ आली आहे. हा रस्ता लवकरात लवकर दुरुस्त करावा. अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे.



डोंगरपाडा आणि खांडस या गावाच्या समोर डोंगरावर असलेल्या आणि आजूबाजूला वन जमिनीचा विळखा असलेल्या तुंगी गावात २०१८ मध्ये वीज पोहचली. ती खासदार बारणे यांच्या निर्धाराने. त्यानंतर तुंगी गावात रस्ता पोहचवण्याचा निर्धार त्यांनी केला आणि तो सुद्धा स्वप्न सत्यात उतरवला. पांधराशे मीटर लांबीचा डोंगरातून जाणारा रस्ता वन विभागची परवानगी घेऊन डोंगरातील दगड फोडून रस्ता बनवला गेला. त्यामुळे या गावाला स्वातंत्र्या नंतर सत्तर आणि पंचाहत्तर वर्षांनंतर या सुविधा या गावाला मिळाल्याने गावकऱ्यांचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.

या रस्त्यावरून खासदार बारणे यांनी सर्वप्रथम आपली गाडी गावामध्ये नेवून आपले पहिले पाऊल ठेवले. त्यानंतर आमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रयत्नाने २०२४ मध्ये डोंगरपाडा ते तुंगी पर्यंत डांबरीकरण केले. २०२४ मधील पावसाळ्यात या रस्त्याचे डांबर वाहून गेले. तेंव्हा पावसाळ्यानंतर नोव्हेंबर मध्ये पुन्हा हा रस्ता दुरुस्त करण्यात आला. मात्र यंदा २६ मे रोजी अवकाळी पावसात पुन्हा या रस्त्याचे डांबर वाहून गेल्याने तुंगी ग्रामस्थांना वाहन घेऊन जायला अडचण होऊ लागली आहे. 'येरे माझ्या मागल्या' अशी परिस्थिती आता होऊन बसली आहे.

# जागतिक पर्यावरण दिनी प्लास्टिकमुक्त नवी मुंबईचा निर्धार

**नवी मुंबई : बातमीदार**

संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रम यांच्यामार्फत या वर्षीच्या जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना 'प्लास्टिक प्रदूषणाचे निर्मूलन' ही असून याकरीता नवी मुंबई महानगरपालिका मोठया प्रमाणावर विशेष मोहीम राबवित आहे. यामधील प्लास्टिकमुक्त नवी मुंबईची संकल्पना प्रत्यक्षात साकारणारा 'नवी मुंबई प्लास्टिक आणि ई–वेस्ट रिसायक्लोथॉन' हा अभिनव उपक्रम महापालिका मुख्यालयापासून सुरु करण्यात आला.याप्रसंगी नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.



याप्रसंगी बोलताना नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी वातावरणातील कार्बन फुटप्रिंट कमी करण्यासाठी वृक्षारोपणाप्रमाणेच प्लास्टिकचा वापर थांबविणेही तितकेच गरजेचे असून त्यादृष्टीने प्लास्टिकमुक्त शहर साकारण्यासाठी नवी मुंबई महानगरपालिका पुढाकार घेऊन काम करीत असल्याचे सांगितले. यादृष्टीने प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या सहयोगाने प्लास्टिक न वापरण्याविषयी जनजागृती, प्लास्टिकचे संकलन व त्याची विविध वस्तूंमध्ये पुनर्निमिती अशा व्यापक स्वरुपात हा उपक्रम राबविला जाणार आहे. या अंतर्गत पहिल्या टप्यात २०० हून अधिक ठिकाणी प्लास्टिक संकलनासाठी पेट्या ठेवल्या जाणार असून त्यामध्ये शाळा, मार्केट, मॉल, हॉटेल्स सोसायट्या अशा ठिकाणांचा समावेश असेल.

या संकलित प्लास्टिकपासून बेन्चेस, पेन, आकर्षक वस्तू बनविल्या जाणार असून त्याचा उपयोग उद्याने तसेच विविध गोष्टींसाठी केला जाणार असल्याची माहिती त्यांनी दिली. नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यालयात एकल वापर प्लास्टिकला प्रतिबंधित करण्यात आले असून याचेच अनुकरण इतर कार्यालयांनीही करावे असे त्यांनी सूचित केले.

कापडी कच–यापासून पुनर्प्रक्रिया उपक्रमासाठी सोसायट्यांमध्ये ठेवण्यात आलेल्या कापडी कचरा संकलन पेट्यांमधील एक पेटी महापालिका मुख्यालयात तळमजल्यावर ठेवण्यात आली. यामध्ये आयुक्तांसह मान्यवर अधिकारी वर्गाने वापरलेले कपडे टाकून या पेटी वापराचा आरंभ केला.

याप्रसंगी चिल्ड्रन्स अकादमी, मालाड येथील विद्यार्थ्यांनी प्रोजेक्ट मुंबई संस्थेच्या संकल्पनेतून प्लास्टिक बाटल्या व थर्माकोलपासून बनविलेल्या मोठया आकाराच्या नळाच्या आकर्षक प्रतिकृती निर्मितीबद्दल आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या विद्यार्थ्यांचे प्लास्टिक पूनर्प्रक्रियेतून निर्माण केलेले पेन देऊन अभिनंदन केले. यावेळी आयुक्तांसमवेत मोठया संख्येने उपस्थित अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी प्रतिबंधात्मक प्लास्टिकचा वापर न करण्याची माझी वसुंधरा अभियान शपथ सामुहिकरित्या घेतली.

# मुस्लिम बांधवांनी ईदच्या निमित्ताने गोवंश हत्या करू नये -शरीफ भालदार

**चौक: प्रतिनिधी**

ईदचे पावित्र्य राखून ईद साजरी करा, ज्यामुळे समाजात भाई चारा वाढेल, जातीय सलोखा राखण्यास मदत होईल असे आवाहन अल्पसंख्यांख विभागाचे खालापूर तालुका अध्यक्ष शरीफ भालदार यांनी केले आहे.



शनिवारी ७ जून रोजी बकरी ईद असून ती देशभर साजरी करण्यात येणार आहे, आपल्या खालापूर तालुक्यात बकरी ईद अतिशय शांतता, जातीय सलोखा आणि भाई चारा निर्माण करण्यासाठी शरीफ भालदार यांनी एक पत्रक प्रसिद्ध केले असून खालापूर तालुक्यातील तुपगाव, तिन्ही हाळ,सांगडा, खोपोली,शिळफाटा, आजीवली येथील मशिदीत जाऊन मौलवी साहेब यांना पत्र दिले असून उद्या शुक्रवारी जुम्मा असून नमाज पठणा नंतर मुस्लिम समाजात जनजागृती करण्यात येणार आहे.मज्जिद मध्ये जाऊन त्यांनी मौलवी साहेब यांना पत्राचे वाटप केले.आपण सर्व बांधव शनिवारी बकरी ईदचा सण साजरा करत आहोत. तुम्हाला भेटण्याचा एकमेव उद्देश म्हणजे आपण सर्वजण (हिंदू मुस्लिम बांधव) एकत्र ईदचा सण साजरा करू असे आवाहन केले. कोणताही धर्म दुखावला जाऊ नये आणि हिंदू मुस्लिम बंधुता टिकवून ठेवूया, गोवंश कुर्बानी देऊ नये.

ईदच्या नमाजानंतर, एक खड्डा खणून त्यात बळीचे टाकाऊ भाग टाकून ते व्यवस्थित बंद करण्याचे आवाहन केले,आजूबाजूला राहणाऱ्या इतर समुदायाच्या लोकांना त्रास,दुखापत होणार नाही.काही समस्या उद्भवली तर ताबडतोब पोलीस ठाण्यात माहिती द्यावी,कुणीही कायदा हातात घेऊ नये,असे करून बंधुभावाने ईद साजरी करू असे आवाहन करून ईद च्या शुभेच्छा दिल्या. तत्पूर्वी उप विभागीय पोलीस अधिकारी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक खालापूर आणि तहसीलदार खालापूर यांना आवाहनाची प्रत दिली.

# मोबाईलच्या दुकानाला आग

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहरातील लाईन आळी मधील एका बंद मोबाईल च्या दुकानाला आग लागली. पण पनवेल अग्निशमन दलाच्या विभागाच्या जवानांच्या प्रयत्नांमुळे मोठी हानी टळली असल्याची घटना घडली आहे.




शहरात लाईन आळी येथे गजबजलेल्या परिसरात टुडे मोबाईल हे दुकान आहे. या गाळ्याचे मूळ मालक उदय बने यांनी हे दुकान भाड्याने दिले आहे. या दुकानातून आज सायंकाळी सहाच्या सुमारास धूर येवू लागला.तो धूर आजूबाजूच्या दुकानात जावू लागला. त्यामुळे थोडी भिती पसरली. त्यावेळी आजूबाजूच्या नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलास पाचारण केले.

त्यांनी लागलीच घटनास्थळी धाव घेतली. आग लागलेले दुकान त्याचा मालक हा बाहेरगावी गेल्याने बंद होते. त्यामुळे दुकानाचे शटर तोडून ते उघडण्यात आले. हे शटर उघडताना धुराचा मोठा भडका बाहेर आला. दुकानात जास्त माल नसल्यामुळे वित्त हानी कमी झाली. पण वेळीच आग आटोक्यात आणली नसती तर मात्र मोठी हानी झाली असती. घटनास्थळी बघ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याने थोडावेळ वाहतूक कोंडी झाली.

# मोरू नारायण म्हात्रे विद्यालयात वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय आणि तुकारामनारायण घरत ज्युनियर कॉलेज ऑफ सायन्स मध्ये ५ जून रोजी जागतिक पर्यावरणदिनाच्या निमित्ताने शालेय प्रांगणात वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी शालेयव्यवस्थापन कमिटीचे चेअरमन भार्गव ठाकूर यांनी शाळेच्या प्रांगणात वृक्षारोपण करुन जागतिक पर्यावरण दिना निमित्त पर्यावरण संरक्षण आणि संवर्धन याचे महत्त्व सांगून पर्यावरण दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

वृक्षारोपणावेळी शाळेच्या मुख्याध्यापिकासायली वडवलकर, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणितागोळे, प्राथमिक विभागाचे पर्यवेक्षक अरुण जोशी उपस्थित होते.



# मोहपाड्यात विद्युत सुरक्षा सप्ताह रॅली

## विविध संदेश देत काळजी घेण्याचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल ग्रामीण उपविभाग–२ अंतर्गत मोहोपाडा विज शाखेची विद्युत सुरक्षा सप्ताह रॅलीचे आयोजन ५ जून २०२५ रोजी करण्यात आले होते. महावितरण कार्यालय मोहोपाडा येथून या रॅलीला सुरुवात करण्यात आली.




रॅली मोहोपाडा मार्केट, नवीन पोसरी येथून काढण्यात आली. या सुरक्षा सप्ताहानिमित्त वीज ग्राहकांच्या सुरक्षेसाठी घोषणाबाजी आणि फलकबाजी केली तसेच ओल्या हाताने विजेचे उपकरण चालू–बंद करू नये, विद्युत संच मांडणीसाठी एमसीबीचा वापर करावा, विद्युत वायरिंग मान्यताप्राप्त कंत्राटदाराकडून करून घ्यावी, विद्युत उपकरणवापरताना आयएसआय दर्जाचे उपकरण वापरावे याबाबत ग्राहकांना मार्गदर्शनकरण्यात आले. पनवेल ग्रामीण विभाग कार्यकारी अभियंता श्री. शिंदे आणि अतिरिक्त कार्यकारी अभियंता संजय ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली काढण्यात आली

या रॅलीचे वेळी उप कार्यकारी अभियंता श्री. राख, सहाय्यक अभियंता लक्ष्मीकांत गलांडे, प्रवीण महाडिक, राकेश म्हात्रे गोलवाड, विकास कांबळे, प्रथमेश पाटील, कैलास खंदारे, संतोष कांबळे, संजय पाटील यांच्यासह कर्मचारी आणि अधिकारी उपस्थित होते. उपक्रमास प्रतिसाद लाभला.

पान १ वरुन

## पनवेल शहर स्वच्छ, सुंदर बनविण्यासाठी कटिबद्ध होऊया

कार्यक्रमास महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजप जिल्हा चिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, कामोठे मंडळ अध्यक्ष विकास घरत, पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, माजी नगरसेवक अनिल भगत, अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज, सुरेखा मोहोकर, वृषाली वाघमारे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, रविकिरण घोडके, स्वरूप खारगे, परिवहन उपव्यवस्थापक अभिषेक पराडकर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, शहर अभियंता संजय कटकेर, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त श्रीराम पवार, डॉ. रूपाली माने, शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, विभाग प्रमुख अनिल कोकरे, महापालिका अधिकारी, महावीर इंटरनॅशनल संस्थेचे पदाधिकारी, निसर्गमित्र संस्थेचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.

या वेळी माजी सभागृह नेते परेश ठाकूर म्हणाले की, प्लास्टिकमुक्तीसाठी महापालिकेने कापडी पिशवी वेंडिंग मशीन बसविली आहे. हा एक स्तुत्य उपक्रम आहे. याबरोबरच महापालिकेने एक लाख झाडे लावण्याचा उत्तम निर्धार केला आहे. महापालिकेने याबाबत केलेले नियोजन पाहता हा उपक्रम यशस्वीपणे राबवला जाईल यात शंका नाही

कापडी पिशवी विक्री मशीन व पुर्नवापर प्लास्टिक व ई–वेस्ट संकलन केंद्र याबाबत उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांनी सविस्तर माहिती देऊन उपस्थितांचे स्वागत केले. या वेळी पर्यावरण रक्षणाबाबत हरित शपथ घेण्यात आली.

## दुखवटा

### चंदर ठोंबरे



**चौक** : खालापूर तालुक्यातील भिलवले गाव आणि परिसरात सामाजिक, धार्मिक क्षेत्रात अग्रणी काम करणारे हभप. चंदर शिवराम ठोंबरे यांचे वयाच्या ९४ वर्षी दुखःद निधन झाले. गावातील शिक्षणाचा प्रसार करताना दारू बंदीसाठी काम केले. त्यांच्या मागे विवाहित दोन मुलगे, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. त्यांचे अंतिम उत्तरकार्य रविवार ८ जून रोजी भिलवले या गावी होणार आहेत.

## संपादकीय

# जातगणनेसह जनगणना

स्वातंत्र्यानंतर झालेल्या कुठल्याही जनगणनेत जातींची गणना झाली नाही. स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच जातनिहाय जनगणना होणार आहे. यापूर्वी देशातील जनगणनांमध्ये फक्त अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींची माहिती घेतली जात होती, परंतु मागास जातींची गणना केली जात नव्हती. आता पहिल्यांदाच जनगणनेसोबत जातिनिहाय जनगणनाही योग्य पद्धतीने होणार आहे.

**कोरोनाच्या महासाथीमुळे लांबणीवर पडलेल्या देशव्यापी जनगणनेची घोषणा केंद्र सरकारने बुधवारी केली. देशभरात जातगणनेसह जनगणना-२०२७ ही प्रक्रिया दोन टप्प्यांमध्ये करण्यात येणार आहे. यापूर्वी २०११मध्ये जनगणना झाली होती. त्यानंतरची जनगणना २०२१मध्ये होणे अपेक्षित होते, परंतु त्या काळात जगभर आणि आपल्या देशातही कोरोनाची महासाथ होती. त्यामुळे जनगणना लांबणीवर टाकण्यात आली. सर्व समाजांच्या सर्वांगीण हितासाठी आणि मागास जातींना न्याय मिळवून देण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने जनगणनेत जातींच्या जनगणनेचा समावेश करण्याचा निर्णय महिनाभरापूर्वी जाहीर केला. युपीए २च्या काळात २०१४मध्ये जातनिहाय सामाजिक व आर्थिक पाहणी केली गेली होती, मात्र त्यातील तांत्रिक तुटींमुळे हा अहवाल मोदी सरकारने प्रसिद्ध केला नाही. ब्रिटिश राजवटीमध्ये १८८१मध्ये पहिल्यांदा जातगणना केली गेली आणि १९३१मध्ये अखेरची जातनिहाय जनगणना केली गेली. १९४१ साली ब्रिटिशांनी जातनिहाय जनगणना केली, पण त्याचे आकडे जाहीर केले नाहीत. स्वातंत्र्यानंतर १९५१मध्ये फक्त अनुसूचित जाती व जमातींची गणना करण्याचा निर्णय घेतला गेला. भारतीय जनता पक्षाने जातीय जनगणनेला विरोध केलेला नाही. बिहारमध्येही अशा जनगणनेला भाजपने पाठिंबाच दिला, परंतु अलीकडच्या काळात विरोधकांनी यासंदर्भात जनतेची दिशाभूल केली. देशभरातील विविध मागासवर्गीय संघटना तसेच काही राज्य सरकारांकडूनही जातनिहाय जनगणनेची मागणी होत होती. केंद्र सरकारने अलीकडेच यासंदर्भात केलेल्या घोषणेमुळे ती मागणी आता पूर्ण होणार आहे. जनगणना हा केंद्र सरकारचा विषय आहे आणि आतापर्यंत काही राज्यांमध्ये करण्यात आलेले जातनिहाय सर्वेक्षण पारदर्शक नव्हते. आगामी जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात जम्मू-काश्मीर व लडाख हे केंद्रशासित प्रदेश तसेच हिमाचल प्रदेश व उत्तराखंड या दोन छोट्या राज्यांचा समावेश असेल. या चार प्रदेशांमध्ये ऑक्टोबर २०२६मध्ये जनगणनेची प्रक्रिया सुरू होईल. उर्वरित देशात दुसरा टप्पा १ मार्च २०२७ रोजी सुरू होईल. या संदर्भात १६ जून रोजी अधिसूचना काढली जाणार आहे. या मोठ्या उपक्रमासाठी ३० लाख गणक आणि त्यांचे पर्यवेक्षक नियुक्त केले जाण्याची शक्यता आहे. २०११च्या जनगणनेनुसार भारताची लोकसंख्या १२१ कोटी १लाख ९० हजार होती. त्यात ६२ कोटी ३७ लाख (५१.५४ टक्के) पुरुष आणि आणि ५८ कोटी ६४ लाख (४८.४६ टक्के) महिला होत्या. आगामी जनगणनेची अंतिम आकडेवारी नेमकी कधी प्रकाशित होणार तेही लवकरच कळेल. जनगणनेची आकडेवारी हाती येईपर्यंत लोकसभा मतदारसंघांच्या पुनर्रचनेची प्रक्रिया पुढे ढकलली जाण्याची शक्यता आहे. कारण मतदारसंघ पुनर्रचनेसाठी ताज्या लोकसंख्येचा आधार लागेल. तामिळनाडूचे मुख्यमंत्री स्टॅलिन यांनी तेथील आगामी विधानसभा निवडणुकांवर डोळा ठेवून मतदारसंघ पुनर्रचनेनंतर दक्षिणेतील राज्यांचे लोकसभेतील घटणारे संख्याबळ हा मुद्दा लावून धरला आहे. सोळाव्या जनगणनेमुळे मधल्या कालखंडात देशाने केलेली मोठी आर्थिक प्रगती समोर येईल तसेच भविष्यात कुठल्या आव्हानांच्या दृष्टीने नियोजन केले पाहिजे तेही स्पष्ट होईल.**

# छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक सोहळा



रायगडावर इ.स. ६ जून १६७४ रोजी छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा गागाभट्ट यांनी राज्याभिषेक केला. सोहळ्यासाठी ३२ मण सोन्याचे सिंहासन बनवले गेले होते. शिवराज्यभिषेकासाठी देशातील कानाकोपऱ्यांतून ब्राह्मणांना आमंत्रण देण्यात आले होते. सुमारे ११००० ब्राह्मण आणि इतर लोक मिळून जवळपास लाखभर लोक रायगड या ठिकाणी जमा झाले होते. यंदाही या सोहळ्याची रायगडावर प्रशासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा भव्य दिव्य झाला. तेव्हाच्या काळात राज्याभिषेक सोहळ्यासाठी चार महिने पाहुण्यांची राहण्याची व्यवस्था, स्वादिष्ट भोजन अशी तयारी केली जात असे. या सोहळ्यात ब्राह्मण, श्रीमंत गणमान्य व्यक्ती. दुसऱ्या राज्यांचे प्रतिनिधी, विदेशी व्यापारी आणि सामान्य जनता असे सर्वच उपस्थित झाले होते. या सोहळ्यासाठी साडेचार हजारा राजांना निमंत्रणे गेली होती.

राज्याभिषेकापूर्वी महाराजांनी विविध मंदिरांत जाऊन देवर्शन केले. सव्वा मण सोन्याची छत्री भवानी मातेस अर्पण केली. नंतर २१ मेपासून ते रागयगडावर धार्मिक विधीत गुंतून गेले. महाराजांनी २८ मे रोजी प्रायश्चित्त केले, जानवे परिधान केले. दुसऱ्या दिवशी दोन राण्यांबरोबर पुन्हा विवाह विधी केला. दुसऱ्या दिवशी महाराजांची सोने, चांदी, तांबे, जस्त, कथील, शिसे, लोखंड अशा सात धातूंनी वेगवेगळी तुला झाली. याशिवाय वस्त्र, कापूर, मीठ, खिळे, मसाले, लोणी, साखर, फळे इत्यादींच्या तुला झाल्या. लाखभर होन ब्राह्मणांना देण्यात आले.

राज्याभिषेकच्या दिवशी पहाटे उठून, मंत्रोच्चार आणि संस्काराबरोबर आंघोळ करून, कुलदेवतेला स्मरून, प्रमुख ब्राह्मणांच्या पायी पडून राज्याभिषेक सुरू झाला. या वेळी शिवाजीमहाराजांनी शुभ्र वस्त्र परिधान केले होते. गळ्यात फुलांच्या माळा घातलेल्या होत्या. राज्याभिषेकात राजाचा अभिषेक आणि डोक्यावर छत्र धरणे हे दोन प्रमुख विधी होते. दोन फूट लांब दोन फूट रुंद अशा सोन्याने मढवलेल्या मंचावर शिवाजी महाराज बसले. आठ प्रधान नद्यांतून आणलेल्या पाण्याने शिवाजीमहाराजांबर अभिषेक केला गेला. सोळा सुवासिनींनी पंचारती ओवाळली. यानंतर शिवाजीने लालरंगाचे वस्त्र परिधान केले. जडजवाहिर, अलंकार परिधान केले. गळ्यात फुलांचे हार घातले. एक राज मुकुट घातला. आपल्या ढाल तलवार आणि धनुष्यबाणाची पूजा केली. मुहूर्ताच्या वेळी राजसिंहासनाच्या दालनात प्रवेश केला.

दालन ३२ शकुन चिन्हांनी सजवलेले होते. शिवाजी महाराज ३२ मण सोन्याच्या सिंहासनावर आरुढ झाले. सोळा सवाष्णींनी त्यांना ओवाळले. ब्राह्मणांनी मोठ्या स्वरात मंत्रांचे उच्चारण केले. 'शिवराज की जय' शिवराज की जय'च्या घोषणा दिल्या गेल्या. सोन्याचांदीचे फुले उधळली गेली. विविध तालवाद्य-सूरवाद्यांच्या जयघोषात आसमंत भरून गेले. ठरल्याप्रमाणे प्रत्येक गडावरून तोफा डागल्या गेल्या. मुख्य पुरोहित गागाभट्टांनी पुढे येऊन राजांच्या डोक्यावर मोत्याची झालर ठेवत 'शिवछत्रपती' म्हणून आशीर्वाद दिला. या निमित्ताने खूप दानधर्मदेखील केला गेला.

राज्याभिषेक झाल्यानंतर शिवरायांनी शिवशक ही नवीन कालगणना सुरू केली. आजही शिवशक ही कालगणना अस्तित्वात आहे. या कालगणनेमागे राजांचा दूरदृष्टीचा महत्त्वपूर्ण गुण दिसून येतो.

शिवराज्याभिषेकानंतर महाराजांनी शिवराई व होन या दोन चलनाची निर्मिती केली. शिवराई ही चांदीची नाणी व होन ही सोन्याची नाणी चलनात आणली. राजांनी राज्यकारभाराच्या सोयीसाठी ही चलन निर्मिती केली. शिवरायांनी राज्याभिषेक झाल्यानंतर राज्यकारभारासाठी मराठी भाषेचा वापर केला. मराठी भाषेस महत्त्व दिले. परकीय भाषा वापरण्यापेक्षा आपली मातृभाषा महाराजांनी राज्यकारभारात वापरली. यातून महाराजांचे भाषा प्रेम दिसून येते....

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही ६ जून रोजी किल्ले रायगडावर हिंदवी स्वराजाचे संस्थापक तथा आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा साजरा होत आहे. यंदाच्या या ३५१व्या सोहळ्याकरिता शिवभक्तांच्या सोयीसुविधांसाठी प्रशासनामार्फत जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे गड परिसरात सुमारे पोलिसांसह अन्य कर्मचारी तैनात असणार आहेत.

किल्ले रायगडावर अखिल भारतीय शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या माध्यमातून शिवरायांचा राज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो. वर्षागणिक या सोहळ्यास शिवभक्तांची गर्दी वाढतच चालल्याचे दिसून येते. त्यामुळे गडावर आणि परिसरामध्ये प्रशासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधा अपुऱ्या पडू लागल्या आहेत. या पार्श्वभूमीवर गेले काही दिवस प्रशासनामार्फत सातत्याने बैठका घेतल्या जात आहेत. यंदादेखील लाखो शिवभक्त गडावर दाखल होतील असा अंदाज आहे. ते लक्षात घेत प्रशासनामार्फत जय्यत तयारी सुरू करण्यात आली आहे.

किल्ले रायगडावर येणाऱ्या शिवभक्तांसाठी पिण्याच्या पाण्याची सुविधा प्रशासनाकडून करण्यात आले आहे. याकरिता गडावरील विविध ठिकाणी असलेल्या तलावातील पाणी एकत्रित केले गेले आहे. त्याचप्रमाणे गडावर पिण्याच्या पाण्याची असुविधा होऊ नये म्हणून प्रशासनाकडून पिण्याच्या पाण्याच्या बाटल्या मोठ्या प्रमाणात पुरवण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे पाण्याच्या टँकरचेदेखील नियोजन करण्यात आले आहे.

लाखो शिवभक्तांच्या वाहनांची पार्किंग करण्यासाठी प्रशासनाकडून कोंझर आणि पाचाड येथे सुविधा केलेली आहे. या ठिकाणी शिवभक्तांनी आपली वाहने पार्क करून तेथून त्यांना एसटी बसने रायगडकडे सोडण्यात येणार आहे. महाड एसटी आगाराकडून याकरिता एसटी बसेस मागवण्यात आलेले आहेत. आरोग्य विभागाची पथकेदेखील या ठिकाणी तैनात करण्यात आली आहेत. चित्त दरवाजा येथून पायी चालत जाणाऱ्या शिवभक्तांचा आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून त्यांच्या सुविधेसाठी गडावर आणि पायरी मार्गावर वैद्यकीय पथके आणि कर्मचारी नियुक्त केले जाणार आहेत. रायगड रोप वेदेखील शिवभक्तांकरिता दिवस रात्र सुरू राहणार आहे. अशा प्रकारे शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी शासनाकडून जय्यत तयारी करण्यात आली आहे.

या सोहळ्यासाठी दोन हजार पोलीस किल्ले रायगड आणि परिसरामध्ये तैनात राहणार आहेत, तर ७०० शासकीय कर्मचारी आणि १२० स्वयंसेवक या ठिकाणी काम करणार आहेत. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घारगे यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांच्यासह दोन पोलीस उपाधीक्षक, ११ पोलीस उपविभागीय अधिकारी, २८ पोलीस निरीक्षक आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक, १४० पोलीस उपनिरीक्षक, ९०० पोलीस कर्मचारी, १३५ वाहतूक पोलीस तसेच पोलीस दलाची विविध पथके या ठिकाणी दाखल होणार आहेत.

छत्रपती शिवाजी महाराजांना मानाचा त्रिवार मुजरा. शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

### व्हॉट्सअॅपचे चार नवे फिचर येणार, जाणून घ्या कसे वापरावे

मेटा कंपनी आपल्या व्हॉट्सअॅप युजर्ससाठी नवे फीचर्स आणून व्हॉट्सअॅप वापरणे अधिक सोपे आणि रंजक करत असते.



अनेकांना व्हॉट्सअॅपच्या नव्या फीचर्सबद्दल माहिती देखील नसते. पण, चिंता करू नका. आज आम्ही तुम्हाला व्हॉट्सअॅप स्टेटसच्या चार नव्या फीचर्सची माहिती देणार आहोत, चला तर मग जाणून घेऊया.

व्हॉट्सअॅप आपल्या युजर्ससाठी लोकप्रिय इन्स्टंट मेसेजिंग अॅप आणखी मजेदार करण्यासाठी अनेक नवीन फीचर्स आणत आहे. आता कंपनीने व्हॉट्सअॅप स्टेटस कस्टमाइज करण्याचे नवे मार्ग सादर केले आहेत. हे अपडेट युजर्सना अधिक क्रिएटिव्ह टूल्सचा वापर करून त्यांच्या दैनंदिन आणि विशेष घटना शेअर करण्यास सपोर्ट करते.

व्हॉट्सअॅप स्टेटस एक पर्सनल स्पेस म्हणून काम करते, जिथे युजर्स आपल्या जवळच्या कॉन्टॅक्ट्सना अपडेट ठेवू शकतात, असं कंपनीनं म्हटलं आहे. नव्या अपडेटमुळे युजर्स आता आपल्या पोस्टमध्ये अधिक कॉन्टॅक्ट जोडू शकणार आहेत. व्हॉट्सअॅप स्टेटसच्या फीचर्सविषयी पुढे जाणून घेऊया सविस्तर.

Layout युजर्स त्यांचे सहा फोटो कोलाजमध्ये बदलू शकतात. एडिटिंग टूल्सचा वापर करून ते तुमच्या सोयीनुसार फोटो मॅनेज करू शकतात.

म्युझिक जोडा तुम्हाला आवडलेलं गाणं स्टेटस म्हणून शेअर करा. किंवा तुम्ही त्या गाण्याला म्युझिक स्टिकरमध्ये रुपांतरित करून वेगळ्या स्टेटस पोस्टमध्ये अॅड करू शकता.

Photo Sticker एखाद्या फोटोला स्टिकरमध्ये रुपांतरित करा आणि आपल्या स्टेटसमध्ये जोडा. आपण ते एडिट करण्यास सक्षम असाल जेणेकरून ते योग्य आकारात आणि शेपमध्ये असेल.

Add Yours फोटो निवडा आणि आपल्या मित्रांना चर्चेसाठी आमंत्रित करण्यासाठी आपले स्टिकर जोडा. जेव्हा ते आपल्या प्रॉम्प्टला प्रतिसाद देतात, तेव्हा ते ते त्यांच्या स्टेटसमध्ये शेअर करू शकतात आणि त्यांच्या कम्युनिटिचे काय म्हणणे आहे ते ऐकू शकतात.

रोलआऊट कधी होणार?

ब्लॉग पोस्टनुसार, हे फीचर्स लवकरच रोलआउट करण्यास सुरुवात होईल आणि येत्या काही महिन्यांत सर्व युजर्ससाठी उपलब्ध होतील.

# कवयित्री आणि लेखिका शांता शेळके



**निमित्त**

ख्यातनाम मराठी लेखिका, कवयित्री, अनुवादक व गीतकार अशी शांता जनार्दन शेळके यांची ओळख राहिली आहे. त्यांचा जन्म १२ ऑक्टोबर १९२२ रोजी इंदापूर (जि. पुणे) येथे झाला. खेड, मंचर या परिसरात त्यांचे बालपण व्यतीत झाले. आज शांताबाईंचा स्मृतीदिन आहे.

शांताबाईंचे आजोबा (वडिलांचे वडील) अण्णा हे शाळामास्तर होते. शांताबाईंचे वडील रेंज फॉरेस्ट ऑफिसर होते. त्यांच्या बदलीच्या नोकरीमुळे चिखलदरा, नांदगाव, खर्डी या गावातही शांताबाईंना वास्तव्य करावे लागले. त्यांच्या वडिलांना त्या दादा आणि आईला (अंबिका वहिनी) वहिनी म्हणत असत. एकूण ही पाच भावंडे त्यात शांताबाई सगळ्यात मोठ्या. आईच्या मृदू स्वभावाचे, तिच्या चित्रकलेचे, तिच्या वाचनवेडाचे संस्कार कळत-नकळत शांताबाईंवर होत राहिले. लहानपणी आजोळी गेल्यावर विविध पारंपरिक गीते, ओव्या, श्लोक त्यांच्या कानावर पडत. त्यामुळे कवितेची आवड, वाचनाची आवड, त्या संस्कारक्षम वयात रूजत गेली. १९३०मध्ये शांताबाईंच्या वडिलांचे निधन झाले त्या वेळी त्या नऊ वर्षांच्या होत्या. चौथीपर्यंत त्यांचे शिक्षण झाले होते.

यानंतर सारेजण पुण्याला काकांकडे आली. अखेर पुढील शालेय शिक्षण पुण्याच्या हुजुरपागेत झाले. सुसंस्कृत सुविद्य, अभिजात अशा या शाळेतील वातावरणाचे संस्कार त्यांच्या मनावर झाले. १९३८मध्ये त्या मॅट्रीक झाल्या आणि पुण्याच्या स. प. महाविद्यालयातून बीए झाल्या. प्रा. श्री. म. माटे, प्रा. के. ना. वाटवे, प्रा. रा. श्री. जोग यांच्यामुळे अभ्यासाच्या पुस्तकाव्यतिरिक्त अवांतर वाचनाची, कवितेची गोडीही वाढत राहिली. या काळात साहित्याचे सखोल संस्कार त्यांच्यावर झाले. कॉलेजच्या नियतकालिकासाठी त्यांनी एक लेख लिहिला. प्रा. माटे यांच्या त्यावरील अभिप्रायाने त्यांना लेखनासाठी हुरूप आला. हळूहळू त्या कविता, लेख, लिहू लागल्या. बीए झाल्याबरोबर मुक्ता आणि इतर गोष्टी नावाचा त्यांचा एक कथासंग्रहही निघाला. याला प्रा. माटेसरांनी प्रस्तावना लिहिली. १९४४मध्ये संस्कृत घेऊन शांताबाई एमए झाल्या. या परीक्षेत त्यांना तात्यासाहेब केळकर सुवर्णपदक मिळाले. एमए झाल्यावर सुरुवातीला त्यांनी आचार्य अत्रे यांच्या समीक्षक मासिकात, नंतर नवयुग या अत्र्यांच्या साप्ताहिकात आणि दैनिक मराठात दोनतीन वर्षे काम केले. विविध प्रकारच्या लेखनाच्या अनुभवाची शिदोरी त्यांना येथे मिळाली. अनेक साहित्याविषयक गोष्टी त्यांना इथे शिकायला मिळाल्या. नागपूरचे हिस्लॉप कॉलेज, मुंबईचे रूईया आणि महर्षी दयानंद महाविद्यालयात त्यांनी अनेक वर्षे अध्यापन केले.

विविध साहित्यप्रकारात विहार करूनही त्यांच पहिलं व खरं प्रेम राहिलं ते कवितेवरच. हळूवार भावकवितेपासून नाट्यगीते, भक्तीगीते, कोळीगीते, बालगीते, चित्रपटगीते, प्रासंगिक गीते अशा विविध रूपातून त्यांची कविता आपल्याला भेटत असते. विविध पुरस्कार त्यांना लाभले आहेत. त्याबरोबरच १९९६मध्ये आळंदी येथे भरलेल्या ६९व्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष म्हणून त्यांना सन्मानित करण्यात आले. ६ जून २००२ रोजी त्या निर्वतल्या. (साभार : इंटरनेट)

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात मुलांना डब्यात काय द्यायचं?

पाऊस आणि शाळा सुरू होणं हे अगदी हातात हात घालूनच येतात. नुकतीच शाळा सुरू होते आणि हळूहळू पाऊसही जोर धरू लागतो. कितीही काळजी घेतली, सांभाळलं तरी अचानक जोरात पाऊस येणं, भिजणं आणि मग किरकोळ तब्येतीच्या तक्रारी सुरू होणं हे शालेय विद्यार्थ्यांमध्ये, विशेषतः लहान वयाच्या मुलांमध्ये खूप कॉमन आहे. त्यात मुलांच्या खाण्याच्या बदलत्या सवयी अजून भर घालतात. त्यामुळे त्यांना शाळेत डब्याला काय द्यायचं असा प्रश्न महिलांना हमखास पडतो.



खूप उष्ण असणारं हवामान तीन चार दिवस सलग पाऊस पडला की एकदम गार होऊन जातं. पहिले काही दिवस जमिनीतून उष्ण वाफा निघत असतात, धूळ धुतली जात असते. पाणी एकदम गढूळ होऊन जातं. हे पाणी पचायला जड असतं आणि शरीरात अम्लता निर्माण करणारं असतं. त्यामुळे पोटाचे आजार, पचनाच्या तक्रारी, सिडिटी असे त्रास उद्भवतात. लहान मुलांमध्ये असं पाणी चुकून जरी पिण्यात आलं तरी पाण्यातून पसरणारे आजार पट्कन होण्याची शक्यता असते. जुलाब होणे, उलट्या होणे, पोट दुखणे, गॅसेस, टायफॉइड असे विविध आजार या दूषित पाण्यामुळे होऊ शकतात.

पचन शक्ती मंदावलेली असताना खाण्यात काही जड पदार्थ आले तर शरीर ते पचवू शकत नाही आणि पोट गुबारणे, काहीच खाण्याची इच्छा न होणे हेही या दिवसांत पहायला मिळते.

पावसात भिजून अंगावर ओले कपडे दीर्घकाळ राहिले, तर तो थंडावा बाधतो आणि सर्दी खोकला ताप या आजारांना निमंत्रण देतो.

अशावेळी करायचं काय, तर ज्या ज्या वेळी शक्य आहे त्या वेळी मुलांना गरमच खायला द्या, लहान मुलांच्या शाळा थोड्या उशीरा असतात व लवकर सुटतात. त्यांना घरुन काहीतरी गरम व पौष्टिक खाऊ घालून पाठवणे आणि पुन्हा घरी आल्यावर गरम खाऊ घालणं हा उत्तम उपाय आहे पण हा प्रॅक्टिकली दर वेळी शक्य होईलच असं नाही पण जेव्हा शक्य होईल तेव्हा तसा प्रयत्न नक्की करावा.

हवेत गारवा आल्यावर लहान मुलांना सर्दी खोकला वारंवार होतो आणि एका मुलाकडून दुसऱ्याला असं सारखं याची लागण होत राहते त्यामुळे गार पदार्थ, आंबट पदार्थ अजिबात देऊ नयेत.

# शिहु-बोरावाडी रस्त्याच्या कामाला मंजुरी

## आमदार रविशेठ पाटील यांचा पाठपुरावा; कार्यकर्ते, ग्रामस्थांनी मानले आभार

**पेण : प्रतिनिधी**

शिहु-बोरावाडी रस्ता गेली कित्येक वर्ष रखडलेला रस्ता नादुरुस्त होता ह्यामुळे सर्व नागरिकांना येण्या जाण्यासाठी त्रास होत असे.हि सर्व बाब लक्षात घेता आमदार रविशेठ पाटील यांनी पाठपुरावा करून ३.९० किमी अंतर असलेले कॉंक्रिट रस्त्यासाठी ६ कोटी ३५ लाख रुपये मंजूर करून घेतले आणि त्याची वर्कऑर्डर पण काढण्यात आली आहे.

लवकरात लवकर रस्त्याचे काम पूर्णत्वास येईल तत्काळ सध्या रस्ता दुरुस्ती करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना आमदार रविशेठ पाटील यांनी दिल्या आहेत. यावेळी बोरावाडी शिहू भागातील आलेल्या कार्यकर्त्यांनी रविशेठ पाटील यांचे मनापासून आभार मानले आणि रविशेठ पाटील साहेबांशिवाय विकासकामांना गती नाही.अनेक जण फक्त त्यांचा स्वार्थापोटी आश्वासने देऊन गेले पण प्रत्यक्षात काम आपण करून दाखवलेत त्यामुळे भर भरभरून आपले आभार मानतो अश्या भावना प्रत्येक कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या

यावेळी युवा नेते ललित पाटील, शिहू गावातील भाजपा तालुका उपाध्यक्ष वसंत मोकल, शिहु बोरावडी येथील कार्यकर्ते रवींद्र लेंडी, दिलीप लेंडी, सीताराम ठोंबरे, पांडुरंग लोभी, देवराम लोभी, नामदेव, लेंडी, गोविंद पारधी,तुकाराम गडखर, परशुराम गडखर, जीवन लेंडी, प्रभाकर लेंडी, यशवंत लेंडी, अंबाजी पारधी, प्रकाश लेंडी, धावजी लेंडी, मधुकर लेंडी, भास्कर लेंडी, शकर लेंडी, हितेश लेंडी, नरेश लेंडी, वसंत गडखर, देवराम पारधी, मच्छिंद्र लेंडी, जनार्दन गडखर, अमित लेंडी, गणपत गाडखर, नामदेव लेंडी, धर्म लेंडी, चंद्रकांत लेंडी, लक्षण लोभी, राजू ठोंबरे, नरेश ठोंबरे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



# पावसाच्या हजेरीने तळा येथे आठवडी बाजारावर परिणाम

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुक्यातील एकमेव बुधवारचा बाजार तळा शहरात भरत असून ४ जून वार बुधवारच्या बाजारावर सकाळपासून पडणाऱ्या पावसामुळे परिणाम झाला असून काही ठरावीक दुकाने मांडल्याचे चित्र पहावयास मिळाले.

दरवर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यातील बाजार हा मोठ्या प्रमाणात भरुन मोठी अर्थिक उलाढाल होत असते मात्र यावर्षी पडत असलेला अवकाळी पाऊस झाल्याने बाजारात काही ठरावीक दुकानेच दिसली दुकाने मांडल्याचे पहावयास मिळाले तसेच नागरिकांची खरेदीसाठी असणारी वर्दळ ही कमी होती. आठवडी बाजार हा सर्वासाठी एका ठिकाणी सर्व वस्तू मिळण्याचे ठिकाण असते. म्हणून हा बाजार नागरिकांसाठी उपयोगी असतो.


कुळगांव बदलापूर नगर परिषद

नवीन प्रशासकीय इमारत, म. गांधी चौक रोड, बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन-४२१५०३. ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ईमेल : coud.kulgaonbadalapur@maharashtra.gov.in वेबसाईट : http://kbmc.gov.in

जा.क्र./ सा.बां/३३५/२०२५-२६ दिनांक :- ५/०६/२०२५

जाहीर ई-निविदा सूचना क्र. २६/२०२५-२६

कुळगांव बदलापूर नगरपरिषद हद्दीत पश्चिम विभागात महाराष्ट्र शासन गृह विभाग मंत्रालय यांच्याकडून शहरातील सुरक्षेतेच्या दृष्टीने सीसीटीव्ही प्रकल्पासाठी MPLS फायबर व इलेक्ट्रील पॉवर सप्लायसाठी केबल टाकणेसाठी खोदलेले रस्ते पूर्वस्थितीत करणे व इतर विकास कामे करणे कामी १६ कामांच्या सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या बांधकाम विभागामध्ये उपलब्ध आहे. सदर कामांकरिता ठाणे सार्वजनिक बांधकाम दर सुचीनुसार प्राकलन तयार करुन त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून टक्केवारी दराच्या ई-निविदा मागविण्यात येत आहे.

सदर ई-निविदा संच विक्री व स्विकृतीचा कालावधी दि. ०६/०६/२०२५ ते दि.१२/०६/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत असून दि. ०९/०६ /२०२५ रोजी दुपारी १२.०० वा. निविदा पुर्वक बैठक नगरपरिषदेच्या कार्यालयातील आयोजित केलेली आहे. तसेच सदर ई-निविदा शक्य झाल्यास दि. १३/०६/ २०२५ रोजी दुपारी ४.०० वा. नंतर उघडण्यात येतील.

निविदेबाबतचा सविस्तर तपशील नगरपरिषदेच्या http://kbmc.gov.in तसेच शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर व नगरपरिषदेच्या सुचना फलकावर उपलब्ध करण्यात आलेला आहे.

सही/-
(मारुती गायकवाड)
मुख्याधिकारी,
कुळगांव बदलापूर नगरपरिषद, कुळगांव


# माणगावजवळ ट्रक व कारच्या भीषण अपघातात चौघे जखमी

**माणगाव: प्रतिनिधी**



मुंबई - गोवा महामार्गावरील टेमपाले येथील उड्डाण पुलावर कारला ठोकर देत, ट्रक कारवर कोसळून झालेल्या भीषण अपघात झाला. सुदैवाने यामध्ये जीवितहानी झाली नसली, तरी चारजण जखमी झाले आहेत. हा अपघात गुरुवार दि. ५ जून रोजी सकाळी झाला. या घटनेनंतर बराच काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

गोरेगांव पोलीस ठाण्याच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार फिर्यादी संजय चंद्रभान चौधरी (वय २२, रा. वडाळा, मुंबई) हे आपल्या ताब्यातील कार घेऊन, मुंबईकडून गोवाकडे जात असताना, महाडकडून माणगांवकडे येत असलेल्या ट्रकने, कारला समोरुन ठोकर दिली आणि त्यानंतर हा ट्रक कारवर कोसळला.

हा अपघात इतका भीषण होता की, दोन्ही वाहने उड्डाण पुलावरुन खाली कोसळता कोसळता वाचली. त्यामुळे सुदैवाने यात जीवितहानी झाली नसली, तरी फिर्यादी संजय चौधरी, साहिल धर्मेंद्रकुमार गुप्ता (वय १९, रा. वडाळा-मुंबई), धनंजय चंद्रभान चौधरी (वय २०, रा. वडाळा मुंबई) आणि ट्रकचालक चंद्रकांत रामदास लडकत हे चौघे जखमी झाले. सर्व जखमींवर माणगांव उपजिल्हा रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

या प्रकरणी गोरेगांव पोलीस ठाण्यात ट्रकचालक रामदास लडकतच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणी गोरेगांव पोलीस ठाण्याचे सहा. पोलीस निरीक्षक विजय सुर्वे आणि पोलीस उपनिरीक्षक एस. एन. रासकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार पी. के. घोडके हे अधिक तपास करित आहेत.


दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि. पनवेल

४७१ कापड बाजार, टिळक रोड, पनवेल

कर्जदार/जामीनदार/गहाणवटदार यांना ६० दिवसांची सूचना

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ च्या कलम १३(२) अन्वये सूचना

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार यांनी दि पनवेल अर्बन को-ऑप. बँकेचे प्राधिकृत अधिकारी म्हणून सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ अन्वये आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेन्ट) नियमन, २००२ च्या नियम ३ सह वाचावयाच्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, सदर कायद्याच्या कलम १३(२) अन्वये मागणी सूचना पारित करून, याखालील सूचिबद्ध कर्जदार / जामीनदार / कायदेशीर वारस / कायदेशीर प्रतिनिधी यांच्याकडे संबंधित मागणी सूचने/नांमध्ये उल्लेखिलेल्या रकमा, खाली दिलेल्या तपशिलानुसार, संबंधित सूचने/नांच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत भरणा करण्याची मागणी केली आहे.

वरील संबंधात, याद्वारे कर्जदार/जामीनदार यांना पुन्हा एकदा सूचना देण्यात येते की, त्यांनी सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत त्यांच्या संबंधित नावांसमोर दर्शविलेल्या रकमा, खाली नमूद केलेल्या संबंधित दिनांकांपासून परताव्याच्या आणि/किंवा संपूर्ण वसुलीच्या दिनांकापर्यंत, सदर कर्जदार/जामीनदार/गहाणवटदार यांच्याद्वारे बनविलेल्या कर्ज करारपत्र आणि इतर दस्तऐवज/लिखिते, जर असल्यास, सह वाचावयाच्या सदर मागणी सूचनांमध्ये तपशिलवार दिल्यानुसार करारात्मक दराने पुढील व्याजासह परतावा करावा.

| अ. क्र. | कर्जदार/जामीनदार/गहाणवटदाराचे नाव | खाते क्रमांक / प्राप्त केलेल्या सुविधेचे स्वरुप / मंजुरीचा दिनांक आणि मंजूर कर्जाची रक्कम / व्याज दर | सूचना पारित केल्याच्या दिनांकापर्यंतची एकूण थकबाकी | मागणी सूचनेचा दिनांक / एनपीएचा दिनांक | तारण संपत्ती/स्थावर मालमत्तेचा तपशील |
|---|---|---|---|---|---|
| (अ) | (ब) | (क) | (ड) | (ई) | (फ) |
| १ | श्री. प्रियेश पांडुरंग कांगी (कर्जदार)<br>सौ. राजश्री प्रियेश कांगी (कर्जदार)<br>श्री. अरुण नारायण म्हात्रे (जामीनदार)<br>श्री. आशिष भगवान दरे (जामीनदार) | 002000100000092<br>गृह कर्ज<br>२९/०१/२०१९<br>रु. ३०,००,०००/-<br>१०.५०% | दि. ३१.०३.२०२५ रोजीनुसार रु. ३५,१८,७७२.०० (रुपये पस्तीस लाख अठरा हजार सातशे बाहत्तर मात्र) अधिक ०१.०४.२०२५ पासूनचे व्याज | २१.०४.२०२५<br>३०.०६.२०२३ | श्री. प्रियेंश पांडुरंग कांगी आणि सौ. राजश्री प्रियेश कांगी यांच्या नावे असलेले घर क्र. १२१८ए (पनवेल महानगरपालिका पनवेलच्या हद्दीमध्ये) क्षेत्रफळ ९०० चौ.फू., मु.-कामोठे, तालुका-पनवेल, जि.-रायगड. |
| २. | सौ. पाडीबाई बाळाराम ठाकरे (दिवंगत श्री. बाळाराम चाहू ठाकरे यांचे कायदेशीर वारस)<br>दिवंगत श्री. बाळाराम चाहू ठाकरे (कर्जदार)<br>सौ. कृष्णा विठ्ठल भोईर (जामीनदार)<br>श्री. रमेश धनराज पाटील (जामीनदार) | LNTC160034<br>मुदत कर्ज<br>३०/१२/२०१५<br>रु. ३०,००,०००/<br>१३ % | दि. ३१.०३.२०२५ रोजीनुसार रु. ११,६५,८२४.६० (रुपये अकरा लाख पासष्ट हजार आठशे चोवीस व पैसे साठ मात्र) अधिक ०१.०४.२०२५ पासूनचे व्याज | २१.०४.२०२५<br>३०.०६.२०२० | दिवंगत श्री. बाळाराम चाहू ठाकरे यांच्या नावे असलेले घर क्र. ७२७, गाव - नानोशी, ता.-पनवेल, जिल्हा रायगड - ४१०२०६. |

*व्याजदर - सुविधा मंजुर करतेसमयी असलेला आणि आरबीआय मार्गदर्शक तत्त्वांनुसार वेळोवेळी बदलण्याच्या अधीन.

कर्जाचे हप्ते/व्याज/मुद्दल न भरल्यामुळे, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार स्तंभ (ई) मध्ये उल्लेखिलेल्या दिनांकास खाते अनुत्पादक मालमत्ता म्हणून वर्गीकृत झाले आहे. आम्ही स्तंभ (ई) मध्ये उल्लेखित दिनांकास हमीचे आवाहन केले आहे. बँकेस देय रक्कम व त्यावरील संपूर्ण परताव्यापर्यंतचे व्याज (यापश्चात "सुरक्षित कर्ज" असे उल्लेखित) स्तंभ (ड) मध्ये उल्लेखिल्यानुसार आहे. उपरोल्लेखित सदर सुविधेअंतर्गत थकबाकी सुरक्षित करण्याकरिता, कर्जदार/गहाणवटदारांनी, इतर बाबींसोबतच, स्तंभ (फ) मध्ये उल्लेखिलेल्या मालमत्ता/संपत्तींच्या संदर्भात प्रतिभुती हितसंबंध निर्माण केले होते. आम्ही याद्वारे कर्जदार, जामीनदार यांच्याकडे सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून ६० दिवसांच्या आत स्तंभ (ड) मध्ये दर्शविलेली रक्कम, संपूर्ण परताव्यापर्यंत करारात्मक दराने पुढील व्याजासह परतावा करण्याची मागणी करीत आहोत.

असे न केल्यास, कायद्याअंतर्गत उपलब्ध असलेले बँकेचे इतर हक्क वापरण्यासोबतच, बँक **सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट कायदा २००२ (यापश्चात "कायदा" असे उल्लेखित)** च्या कलम १३(४) अन्वये देण्यात आलेल्या सर्व अधिकारांचा वापर करण्यास इच्छुक आहे. कर्जदार/जामिनदारांनी सुरक्षित कर्जाचा परतावा न केल्यास, बँकेद्वारे जप्त करावयाच्या तारण संपत्ती/त्तींचे तपशील स्तंभ (ड) मध्ये उल्लेखिल्यानुसार आहेत. **तारण संपत्ती सोडविण्याकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात कायद्याच्या कलम १३ च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदार/गहाणवटदाराचे लक्ष याद्वारे वेधण्यात येत आहे.** कृपया नोंद घ्यावी की, सदर कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, सदर सूचना प्राप्त झाल्यानंतर, कर्जदार/गहाणवटदारवरील उल्लेखित कोणत्याही तारण मालमत्तांचे बँकेच्या लेखी पूर्व परवानगीशिवाय विक्री, भाडेपट्टी किंवा अन्य मार्गे (व्यवसायाच्या सर्वसाधारण पद्धतीशिवाय) हस्तांतरण करू शकत नाहीत. कर्जदार/जामीनदार यांना अशीही सूचना देण्यात येते की, सदर वैधानिक आदेश /प्रतिबंधाचे कोणतेही उल्लंघन, सदर कायद्याच्या तरतुदींनुसार, गुन्हा आहे. कोणत्याही कारणास्तव, तारण संपत्ती व्यवसायाच्या सर्वसाधारण पद्धतीने विक्री करण्यात आल्यास, विक्री मोबदला किंवा मिळालेले उत्पन्न बँकेकडे जमा करण्यात येईल/पाठविण्यात येईल. कर्जदार/जामीनदार यांनी अशा मोबदला/उत्पन्नाचे योग्य खाते प्रस्तुत करावे. **अन्य तारण संपत्ती जप्त करण्याचे आमचे हक्क आम्ही राखून ठेवीत आहोत.**

कृपया सदर सूचनेअंतर्गत सदर मागणीचे पालन करावे आणि सर्व अप्रिय गोष्टी टाळाव्या. जर पालन न केल्यास, पुढील अवलंब केलेल्या आवश्यक कृतींकरिता, कर्जदार/गहाणवटदारांना सर्व खर्च आणि परिणामांसाठी जबाबदार धरण्यात येईल.

सदर सूचना बँकेच्या डीआरटी/न्यायालयासमक्ष कायदेशीर कारवाई करण्याच्या पूर्वग्रहाशिवाय, परिस्थितीनुसार, पारित करण्यात येत आहे. सदर सूचना बँकेच्या डीआरटी/न्यायालयासमक्ष प्रलंबित दाव्या/खटल्यामधील बँकेच्या हक्काच्या पूर्वग्रहाशिवाय पारित करण्यात येत आहे.

दिनांकः ०६.०६.२०२५
ठिकाणः रायगड

सही/-
प्राधिकृत अधिकारी
दि पनवेल को-ऑप. अर्बन बँक लि.


# पोलीस पाटील संघाच्या जिल्हाध्यक्षपदी विकास पाटील

**अलिबाग : प्रतिनिधी**



रायगड जिल्हा पोलीस पाटील संघाच्या जिल्हाध्यक्षपदी विकास पाटील यांची निवड करण्यात आली.

रायगड जिल्हा पोलीस पाटील संघाची आढावा बैठक तपस्वी रामजी लक्ष्मण घरत समाजमंदिर झिराड, अलिबाग येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत रायगड जिल्ह्याची नवीन कार्यकारिणी निवडण्यात आली. राज्याध्यक्ष बाळासाहेब शिंदे-पाटील तसेच संघाचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. बाळासाहेब शिंदे - पाटील यांनी रायगड जिल्ह्यातील सदस्यांशी चर्चा करून त्यांच्या शंकांचे निरसन केले

या बैठकीमध्येच रायगड जिल्ह्याची नवीन कार्यकारणी एकमताने जाहीर करण्यात आली. यामध्ये विकास हरिश्चंद्र पाटील यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. मधुकर दामू डायरे उपाध्यक्ष, कुणाल लोंढे सचिव, रवींद्र आयरे खजिनदार अशी निवड करण्यात आली. ॲड. सचिन पाटील यांची कायदेशीर सल्लागार म्हणून, महिला जिल्हाध्यक्ष सौ. सविता गायकर, महिला जिल्हा उपाध्यक्ष श्रीमती स्वप्नीजा सातनाक, मावळते जिल्हाध्यक्ष संतोष दौलत दळवी यांची राज्य संघटक म्हणून नियुक्ती करण्यात आली.


पाहिजेत

नामांकित प्रायव्हेट सिक्युरिटी एजन्सी मध्ये पनवेल या ठिकाणी एक जागा भरणे आहे.

| पदनाम | संख्या |
|---|---|
| १) सिक्युरिटी सुपरवायझर | ०१ |

अनुभवास प्राधान्य दिले जाईल/( Ex- Army)

मोबाईल नं. : ७०२०८९६३५३, ९६६५५३२९५०



महाराष्ट्र शासन
सा. बां. (आदिवासी) विभाग, ठाणे
ई-निविदा सूचना प्रसिध्दी क्रं. ५ सन २०२५-२६

कार्यकारी अभियंता, सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२५४१००४६ हे ई - निविदाव्दारे (ऑनलाईन) खालील कामांकरीता बी-१ नमुन्यातील निविदा महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या वर्गातील **आदिवासी विकास विभागाकडील नोंदणीकृत वर्ग ५ व त्यावरील स्थापत्य विषयक कंत्राटदार यांचेकडून मागवित आहे. निविदा डाऊनलोड करण्याचा दि.०६/०६/२०२५ ते दि. १३/०६/२०२५ पर्यंत. निविदा पूर्व बैठक दि. ०९/०६/२०२४ रोजी दु. १२.०० वाजता मा. मुख्य अभियंता, बांधकाम भवन कक्ष, आदिवासी विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई यांचे कार्यालयात (शक्य झाल्यास) किंवा ऑनलाईन घेण्यात येईल. ई-निविदा उघडण्याचा दिनांक- १६/०६/२०२५ ( शक्य झाल्यास)**

| अ. क्र. | कामाचे नाव | निविदा रक्कम (अ+ब) (रु.लक्ष) | कंत्राटदाराचा वर्ग | निविदा संचाची किंमत व प्रकार |
|---|---|---|---|---|
| १ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा कळमदेवी, ता. उपलाट, जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत. | ७,३८,७६,७६०/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| २ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा खुटल, ता. जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत | ७,३४,९२,०२१/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| ३ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा उपलाट, ता. तलासरी, जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत. | ७,३१,०७,७७८/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| ४ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा संकुल ऐना ता. जव्हार जिल्हा. पालघर येथे मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे बांधकाम | ७,२८,९०,७१८/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| ५ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा सवणे, ता. तलासरी, जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत. | ७,१५,११,६००/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| ६ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा एम्बूर, ता. जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत | ७,०८,३३,४२१/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| ७ | सवतगव्हाण ता. माळशिरस, जिल्हा सोलापूर येथील शासकीय आदिवासी आश्रमशाळेतील मुलींच्या वसतिगृहाच्या (G+३) इमारतीचे बांधकाम | ७,००,९८,७०२/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| ८ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा वरुडा, ता. जिल्हा. धाराशिव येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत. | ६,९३,२१,३३८/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| ९ | शासकीय आदिवासी आश्रमशाळा लालठाणे, ता. जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+३) इमारत. | ६,३०,३५,७०३/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| १० | शासकीय आदिवासी आश्रम शाळा ओझर ता: जव्हार जि: पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची इमारत | ५,९०,०४,७४०/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| ११ | शासकीय आश्रम शाळा वरसई, ता. पेण, जिल्हा. रायगड येथे मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीचे (G+३) बांधकाम | ५,८७,५८,९९९/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| १२ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा सूर्यमाळ ताः मोखाडा जि. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची इमारत | ५,८७,३०,७२८/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| १३ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा घनवळ ताः मोखाडा जि: पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची इमारत | ५,८७,०१,३७४/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |
| १४ | शासकीय आदिवासी आश्रम शाळा वरखंडा (दापचरी), ता. तलासरी, जिल्हा. पालघर येथे मुलांच्या वसतिगृहाची (G+२) इमारत. | ५,८२,०४,८९२/- | वर्ग-२ व त्यावरील | ३,५४०/- बी-१ |

१. सर्व पात्र / इच्छुक निविदाकारांनी निविदापत्रक डाऊनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेण्यासाठी ई निविदा प्रणालीच्या http://mahatenders.gov.in या पोर्टलवर enrolled करणे आवश्यक आहे. सदरील कामात काही बदल अथवा वेळेत बदल झाला तरीही तो बदल नमूद वेबसाईटवर पहावे. या बाबत फेर वर्तमान जाहीरात करण्यात येणार नाही याची वाचकांनी नोंद घ्यावी.
२. निविदाकारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका / अडचणी असल्यास त्यांनी खालील दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावी. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा / बयाना रक्कम ई-निविदा संचाचे किंमत याबाबत दस्तऐवजाच्या मुळ प्रती स्वतःच्या नावाची गोपनीयता बाळगून ई-निविदा वेळापत्रकामध्ये नमूद केलेल्या दिनांक व वेळेपर्यंत सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा ई-निविदा प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही.
३. एक कंत्राटदार, फर्म किंवा कंपनीस या निविदा सुचनेतील उल्लेख केलेल्या १४ कामांपैकी एकच काम घेता येईल. जर कंत्राटदार, फर्म किंवा कंपनी पहील्या किंवा कोणत्याही एका कामाच्या निविदेत सर्वात कमी निविदा देकार सादर करणारा आढळल्यास त्यांचे इतर निविदा उघडल्या जाणार नाहीत आणि त्यांनी या निविदा सुचनेमध्ये सादर केलेल्या इतर देकारांना निविदांमध्ये अपात्र मानले जाईल. निविदा उघडण्याचा क्रम हा निविदेत नमुद केलेल्या कामांच्या अनुक्रमांकाप्रमाणे (ई-निविदा क्रमांक) प्रमाणे असेल.
४. इतर अटी व शर्ती ई-निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची ई-निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचा अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

जा.क्र. साबां (आ) विठा/ठाणे/निविदा/ क्रं. ५/२९४९
कार्यकारी अभियंता यांचे कार्यालय, सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे
९ वा मजला, पार्किंग प्लाझा बिल्डिंग, ज्यूपिटर हॉस्पीटल जवळ, पूर्व द्रुतगती मार्ग, ठाणे (प.) ४००६०१
ईमेल पत्ता :- eepwdtribalthane@gmail.com
दिनांक :- ०२/०६/२०२५
आरओसी-२०२५-२०२६/क्र.-५/सी १०११

सही/-
कार्यकारी अभियंता,
सा.बां. (आदिवासी) विभाग, ठाणे



परिशिष्ट क्र. १६
(उपविधी क्र. ३५ अन्वये )
मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरित करण्याबाबत हक्क मागण्या

नोटीस

सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित, पत्ता न. पनवेल, या संस्थेचे सदस्य असलेल्या वा संस्थेच्या इमारतीत / भूखंडावर / गाळा/ बंगला क्र. ...... धारण करणाऱ्या श्री / श्रीमती निलिमा दिनेश वाळींबे यांचे तारीख १२/०५/२०२५ रोजी निधन झाले. त्यांनी नामनिर्देशन केलेले नाही. संस्था, या नोटिशीद्वारे संस्थेच्या भांडवलात/मालमत्तेत असलेले मयत सदस्याचे भाग व हितसंबंध हस्तांतरित करण्यासंबंधी मयत सदस्याचे वारसदार किंवा अन्य मागणीदार/हरकतदार यांच्याकडून हक्क मागण्या / हरकती मागवण्यात येत आहेत. ही नोटीस प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसात त्यांनी आपल्या मागण्यांच्या वा हरकतींच्या पुष्टयर्थ आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती व अन्य पुरावे सादर करावेत. जर वर नमूद केलेल्या मुदतीत, कोणाही व्यक्तीकडून हक्क मागण्या किंवा हरकती सादर झाल्या नाहीत तर, मयत सदस्याचे संस्थेच्या भांडवलातील/मालमत्तेतील भाग व हितसंबंध यांच्या हस्तांतरणाबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्याची संस्थेला मोकळीक राहील. जर अशा कोणत्याही हक्कमागण्या/हरकती आल्या तर, त्याबाबत संस्थेच्या उपविधीनुसार कार्यवाही करण्यात येईल. नोंदी व उपविधींची एक प्रत मागणीदारांस/हरकतदारांस पहाण्यासाठी संस्थेच्या कार्यालयात सचिव यांचेकडे दुपारी १२.०० वा. ते दुपारी ४.०० वा. पर्यंत, नोटिस दिल्याच्या तारखेपासून नोटिशीची मुदत संपण्याच्या तारखेपर्यंत उपलब्ध राहील.

ठिकाण : न.पनवेल
दिनांक : ०५/०६/२०२५

सही/-
सचिव
सरकारी नोकर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित
सेक्टर २, नवीन पनवेल



पनवेल महानगरपालिका
ता. पनवेल, जि. रायगड, पनवेल ४१०२०६

बाजारभाव मागविणेबाबत सूचना

पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामाकरीता योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत व अनुभवी यांचेकडून सध्याच्या बाजारभावांची मागणी केली जात आहे. इच्छुक पुरवठादारांनी / कंत्राटदारांनी आपले दर लेखी स्वरूपात वृक्ष प्राधिकरण विभागात दि.१२/०६/२०२५ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत सादर करावीत. कामाचा विस्तृत तपशील विभागात पहावयास उपलब्ध आहे.

| अ.क्र. | कामाबाबत तपशील | दर |
|---|---|---|
| १ | मोबाईल ॲप्लिकेशनच्या सहाय्याने नव्याने लागवड झालेल्या झाडांची नोंद करणे व झाडे तोडणी प्रक्रियेच्या व्यवस्थापनासाठी मोबाईल ॲप्लिकेशन व डॅशबोर्ड तयार करणेबाबत. | |

दि. ५/०६/२०२५
जा.क्र.पमपा/उद्यान/४०/२०२५

सही/-
उपायुक्त (वृक्ष प्राधिकरण)
पनवेल महानगरपालिका



जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल मेसर्स **साहिल असोशिएटस् बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स तर्फे भागीदार १) श्री. चिराग अशोक जयधारा २) श्री. साहिल अशोक जयधारा यांनी मे. व्ही. जी. डेव्हलपर्स तर्फे प्रोप्रायटर श्री. सुहास इंद्रजीत नांदोडकर, कार्यालयीन पत्ता - १०२, जे.के. चेंबर्स, सेक्टर नं. १७, वाशी, नवी मुंबई** यांचे भाडेपट्टा मालकी हक्काचा खालील वर्णनाचा भुखंड त्यांचेकडुन कायमस्वरूपी त्रिपक्षीय भाडेपट्टा कराराने आणि इतर अनुशंगिक दस्तऐवजाने आपले लाभात कायमस्वरूपी भाडेपट्टा मालकी हक्काने हस्तांतरीत करून घेण्याचे योजले आहे.

भूखंडाचे वर्णन

| नोड | भूखंड क्रमांक | सेक्टर क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|
| उलवे | ३८६ | १९ | ९९.७४ चौ.मी. |

वर नमुद भुखंड खालील नमूद संपादित मिळकतीच्या अनुशंगाने वाटप करण्यात आलेला आहे.

मिळकतीचे वर्णन
मौजे - वहाळ, ता. पनवेल, जि.रायगड

| युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| २३९ ब | २३ | २ | ०-१४-१० | -- |

वर नमूद भुखंडास अनुसरून कुणीही व्यक्ती, संस्था, कंपनी, भागीदारी इत्यादींचा कुठल्याही प्रकारचा दान, गहाण, तारण, खरेदी, बयाणा, कर्ज, पोटगी, अन्न-वस्त्र, निवारा, वहिवाट, बक्षिस इत्यादीद्वारे मालकी अथवा इतर कसलाही हक्कहितसंबंध असल्यास, सदर जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसांचे आत** आपले हक्क हितसंबंधाच्या स्वरूपासहित प्रथमदर्शनी पुराव्यासह खालील सही करणार यांसकडे खाली नमूद पत्यावर आपल्या लेखी हरकती रजिस्टर पोस्टाद्वारे अथवा समक्ष दाखल कराव्यात, सदर १५ दिवसांचे आत कुणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास आमचे अशिल सदर वर नमूद भुखंडाचे हस्तांतरण त्रिपक्षीय भाडेपट्टा करार आणि इतर अनुशंगिक दस्तऐवजाद्वारे कायदेशिरपणे पूर्ण करतील व त्यानंतर मागावून आलेल्या कसल्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक असणार नाहीत.

दिनांक : ०५/०६/२०२५
ठिकाण : पनवेल

सही/-
**शरद रामचंद्र जाधव**, वकील
(बी. कॉम. एलएल. बी.)
नोंदणी क्र. एम ए एच्-३५८६/ २००८
कार्यालयीन पत्ता : कार्यालय क्र. ००१, तळमजला, रॉयल प्राईड, भुखंड क्र. ११३, एम.सी.सी.एच. सोसायटी, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड - ४१०२०६.

# मालमत्ता कर दोन भागातच घ्यावा

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेने यावर्षीपासून मालमत्ता कराबाबत नवीन पद्धती जाहीर केली आहे त्यानुसार वर्षातून सहा सहा महिन्यांच्या अंतराने येणारा मालमत्ता कर यापुढे एकदाच एकरकमी भरावा लागणार आहे.त्यासाठी १० टक्के कर सवलतीचे आमिष नागरिकांना पालिकेने दाखवले आहे. पालिकेसाठी हा निर्णय सुलभ ठरणार असला तरी, सामान्य नागरिकांसाठी मात्र एकरकमी कर भरणे अवघड जाणार आहे. दिलेल्या मुदतीत कर न भरल्यास व्याज भरावे लागणार आहे. त्यामुळे यापूर्वी दोन भागात इमानेइतबारे कर भरणाऱ्या नागरिकांना पालिकेच्या या 'एकरकमी कर पद्धतीचा फटका बसणार का ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.याबाबंत भाजपाचे विजय घाटे यांनी आयुक्तांना पत्र देऊन मालमत्ता कर भरणे पुन्हा दोन भागात करावे जेणेकरून सामान्य नागरिकांना भुर्दंड न पडता सहजतेने कर भरता



येईल अशी मागणी पत्रातून केली आहे. तसेच याविषयी आगामी काळात येणाऱ्या प्रशासकीय अडचणींवर देखील घाटे यांनी बोट ठेवले आहे.

यावर्षी प्रथमच मालमत्ता कर तोही पूर्ण वर्षाचा दोन महिन्यात भरण्यासाठीची देयके नमुंमपा तर्फे देण्यात येत आहेत. नमुंमपाच्या पोर्टलवर प्रसारित झालेली आहेत. यापूर्वी मालमत्ता कर देयके ही दोन भागात येत होती म्हणजे पहिले १ एप्रिल ते ३० सप्टेंबर व दुसरे १ ऑक्टोबर ते ३१ मार्च. त्यामुळे वर्षाचा एकत्रित भार हा नागरिकांवर येत नव्हता; परंतु नवीन पद्धतीमुळे प्रचंड ताण नागरिकांवर आल्यामुळे नागरिकांत रोषाचे

## भाजपचे विजय घाटे यांची आयुक्तांकडे मागणी

वातावरण आहे. त्यातही भर म्हणून संपूर्ण वर्षाचा कर हा दोन महिन्यात भरायचा आहे, आणि देयकांचे वितरण हे गेल्या महिन्याच्या अंती करण्यात येत असून साधारण १५ जून २०२५ पर्यंत सगळी देयके नागरिकांना मिळणार आहेत.

त्यामुळे नागरिकांना कर भरण्यासाठी फक्त पंधरा दिवस हाती मिळणार आहेत.३० जूनच्या आत कर भरल्यास नागरिकांना १० टक्के सवलत मिळणार आहे. मात्र जून नंतर कर भरल्यास काय? जून २०२५ नंतरच्या देयकांवरील रक्कमेवर व्याज भरावे लागणार आहे, त्यात जी देयकांची रक्कम १ ऑक्टोबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ ची आहे त्यावरही व्याज जुलै २०२५ पासून भरावे लागणार आहे.त्यामुळे जे नगराईक आजमितीस इमाने इतबारे दोन भागात कर भरत होते त्यांना नागरिकांना या चुकीच्या निर्णयाचा फटका बसणार आहे. त्यामुळे सदरची व्यवस्था तात्काळ रद्द करून पूर्वी असलेली पद्धत कार्यरत ठेवावी अशी मागणी घाटे यांनी केली आहे.

पालिकेने नागरिकांवर लादलेल्या या एकरकमी करपद्धतीवर घाटे यांनी काही प्रश्न उपस्थित केले आहेत. यात पालिकेला मालमत्ता कर जे दोन भागात द्यायचा आहे तो एका भागातच घेण्याचे कारण काय? पालिकेच्या प्रमुख उत्पन्न स्तोत्राची रक्कम तीन ते चार महिन्यात वसूल करून उर्वरित काळात पालिकेच्या उत्पन्नाची अपेक्षा नसताना ह्या रकमेच्या खर्चानंतर पालिकेकडे कर्मचाऱ्यांचे पगार व इतर कामासाठी निधीचे नियोजन आहे का? जे नागरिक एकत्र हा कर भरू शकत नाहीत त्यांना या नियोजनामुळे दुसऱ्या भागाची रक्कम पहिल्या भागात भरण्याचा व ना भरल्यास व्याज हा दंड लावून सामान्य नागरिकांना त्रास का? असे अनेक प्रश्न घाटे यांनी उपस्थित केले आहेत.

# नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात ७ जुलैला लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे जून महिन्याच्या लोकशाही दिनामध्ये एक अर्ज प्राप्त झाला. अतिक्रमण विभागाशी संबंधित अर्जाची सुनावणी आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी घेतली.

माहे जुलै महिन्याचा लोकशाही दिन ७ जुलै २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये २३ जून २०२५ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

लोकशाही दिनाकरीता करावयाच्या अर्जाचा विहित नमुना नवी मुंबई महानगरपालिकेच्या www.nmmc.gov.in या संकेतस्थळाच्या मुख्यपृष्ठावर जलद दुवे आयकॉनवर उपलब्ध असून ती अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करुन घेता येऊ शकते. त्याचप्रमाणे महानगरपालिका नूतन मुख्यालय इमारत, जनसंपर्क विभाग, तिसरा मजला, से.१५ ए, किल्ले गांवठाण जवळ, सी.बी.डी., बेलापूर येथेही प्रत नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध आहे.अर्ज करताना नागरिकांनी शासन निर्णयानुसार अर्जात नमूद तक्रार / निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दखल घ्यावयाची आहे. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक- आस्थापना विषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावयाची आहे.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार / निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी, असे सूचित करण्यात येत आहे.

# सोनारी येथील साईबाबा मंदिराचा वर्धापन दिन



**उरण : वार्ताहर**

श्री क्षेत्र साई बाबा मंदिर सोनारी २०वा वर्धापन दिन निमित्ताने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. स्वर्गीय लक्ष्मण गोपाळ तांडेल यांच्या प्रेरणेने व दानशूर साई सेवकांच्या सह कार्यातून दिनांक ३/६/२००५ रोजी सोनारी नगरीत साई बाबांचे मंदिर साकार झाले. मंगळवारी या मंदिराचा २० वा वर्धापन दिन विविध कार्यक्रमानी साजरा करण्यात आला.

सोमवारी सकाळी ६ वाजता श्रींची काकड आरतीसकाळी ६.३० मंगलस्नान. ७ वाजता शिर्डी माझे पंढरपूर आरती. ७.३०.वाजता साई स्तवन मंजीरी सहस्त्र नामावली. सकाळी ८ वाजता श्री साईसचरित्र (साई सार)वाचन दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती. सायंकाळी ६ वाजता धूप आरती.

मंगळवारी सकाळी ६ वाजता श्रींची काकड आरती. ६.३० वाजता मंगलस्नान. ७ वाजता आरती. सकाळी ८ वाजता श्री सत्यनारायणाची महापूजा करण्यात आली. यांच्यातर्फे सकाळी ११.३० वाजता साई सार वाचन. १२ वाजता मध्यान्ह आरती. दुपारी १२.३० महाप्रसाद मनाली सागर कडू यांच्या तर्फे दुपारी १२.३० महाप्रसाद देण्यांत आले. सायंकाळी ६ वाजता धुपारती. रात्री ८ वाजता साई पालखी मिरवणूकीने कार्यक्रमाची सांगता झाली.

या वेळी देवस्थान चे विश्वस्त श्रीमती विमल लक्ष्मण तांडेल, सँटी महेंद्र तांडेल, महेंद्र गजानन ठाकूर, मंजुळा महेंद्र ठाकूर रामचंद्र घरत (अध्यक्ष साई दिंडी), रामदास बुवा म्हात्रे, गणेश ठाकूर, जयवंत कडू, केशव कडू, वसंत घरत, जनार्दन म्हात्रे, सौ. भारती दयाराम तांडेल, कलावती वामन कडू, प्रिया परशुराम कडू, श्री रत्नेश्वरी साई प्रेरणा भजन मंडळ जसखार आदी सह साई भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तृतीयपंथी नागरिकांचा प्लास्टिक प्रतिबंधात्मक जनजागृती मोहीमेत सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

महानगरपालिकेच्या वतीने आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून प्लास्टिक निर्मूलनासाठी विविध मोहीमा हाती घेण्यात येत असून त्यामध्ये लोकसहभागावर भर दिला जात आहे व विविध उपक्रमांना नागरिकांचा उत्तम सहभाग लाभत आहे.



या अनुषंगाने आज जागतिक पर्यावरण दिनाच्या पूर्वदिवशी प्लास्टिकऐवजी कापडी पिशव्यांचा वापर करा अशा संदेश प्रसारणासाठी सर्वच विभाग कार्यालय क्षेत्रांतील मोठ्या मार्केट्समध्ये विक्रेते व ग्राहक असणाऱ्या नागरिकांमध्ये प्लास्टिक न वापरण्याविषयी जनजागृती तसेच कापडी पिशव्यांचे वाटप असा उपक्रम व्यापक स्वरूपात राबविण्यात आला.

यामध्ये वाशी विभागातील उपक्रमात विशेष म्हणजे तृतीयपंथी नागरिकांनी प्लास्टिकला नकार मोहीमेत सक्रिय सहभागी घेतला. सेक्टर ९ येथील भाजी मार्केटमध्ये त्यांनी दुकानदार व नागरिकांना प्लास्टिक पिशव्या न वापरण्याचे आवाहन केले. त्याचप्रमाणे यावेळी नागरिकांना कापडी पिशव्यांचे विनामूल्य वाटप करण्यात आले. या उपक्रम आयोजनात लेट्स सेलिब्रेट फिटनेस संस्थेच्या प्रमुख रिचा समित तसेच किन्नर मां सामाजिक संस्था यांनी पुढाकार घेतला.

अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार यांच्या नियंत्रणाखाली, घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ. अजय गडदे, परिमंडळ १ उपआयुक्त सोमनाथ पोटरे, वाशी विभागाचे सहा. आयुक्त सुखदेव येडवे यांच्या माध्यमातून मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे, स्वच्छता अधिकारी जयश्री आढळ आणि वाशी विभागातील कर्मचा-यांनी सहभागी होत ही मोहीम यशस्वी केली. नवी मुंबईतील विविध उपक्रमांत तृतीयपंथी नागरिकही उत्साहाने सहभागी होत शहराप्रती असलेली आपली आपुलकी आणि कर्तव्य प्रकट करीत असतात.

# शिक्षकमित्र बाळासाहेब म्हात्रे यांच्या जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर




**उरण : वार्ताहर**

ज्ञान प्रसारक शिक्षण संस्थेचे संस्थापक शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांच्या ७३व्या जयंतीनिमित्त आवरे येथे शिक्षकमित्र बाळासाहेब म्हात्रे कॉलेज ऑफ आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्सच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रारंभी शिक्षक मित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांच्या कार्यकर्तृत्वाच्या जीवनपट फलकास पुष्पचक्र अर्पण करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन संस्थेच्या अध्यक्षा पुष्पलता बाळासाहेब म्हात्रे यांच्या हस्ते झाले.

या वेळी सुयश म्हात्रे यांनी शिक्षकमित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांच्या कार्यप्रणालीवर आधारित निर्माण केलेल्या लघुपटाचे सादरीकरण केले. प्राचार्य राजेंद्र म्हात्रे सुनील वर्तक, रवींद्र पाटील यांची यथोचित भाषणे झाली. रक्तदान शिबिरात ५८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. त्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी माजी सरपंच निराबाई पाटील, सचिव रामनाथ म्हात्रे, विश्वस्त मेघा म्हात्रे, विश्वस्त डॉ. समृद्धी मोरे, खजिनदार डॉ. सुखदा चिराटे, अंजली म्हात्रे, विद्या म्हात्रे, प्रभाकर म्हात्रे, सेवानिवृत्त वनाधिकारी महादेव गावंड, राजश्री गावंड, माजी उपसरपंच चंद्रकांत गावंड, ज्ञानेश्वर गावंड, दर्पण मोरे, सुजित चिराटे, प्राचार्य विलास शेणवी, प्राचार्य सुभाष ठाकूर, माजी उपप्राचार्य अजित आडकर, उपप्राचार्य वैदेही म्हात्रे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकवर्ग यांची उपस्थिती होती.

रक्तदान शिबिराच्या यशस्वीतेसाठी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान संचालित स्वस्तिक रक्तपेढी, कामोठे, नवी मुंबई व प्राचार्य सुभाष ठाकूर तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य केले. प्रभारी प्राचार्य सुविद्य गावंड यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शरद केणी यांनी तर आभार शिवहरी गावंड यांनी व्यक्त केले.

## महावितरणतर्फे वसुंधरा दिवस उत्साहात साजरा

**नवी मुंबई : बातमीदार**

महावितरणच्या वर्धापन दिनाच्या निमित्ताने 'शुन्य अपघात महावितरण,शुन्य अपघात महाराष्ट्र' ही संकल्पना घेऊन दि. १ ते ६ जून २०२५ या कालावधीत संपूर्ण राज्यात विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. आज दि.५जून रोजी वसुंधरा दिवस म्हणून साजरा करण्यात आला. वसुंधरा दिवसाचा औचित्य साधून पर्यावरणपुरक उपक्रम म्हणून वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर, कर्मचाऱ्यांची रॅली काढण्यात आली. यावेळी कार्यकारी संचालक परेश भागवत, भांडूप परिमंडळाचे मुख्य अभियंता, संजय पाटील, मुख्य महाव्यवस्थापक भूषण कुलकर्णी, महाव्यवस्थापक राजेंद्र पांडे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

## वृक्षारोपण



**नवी मुंबई : सिडकोतर्फे बुधवारी जागतिक पर्यावरण दिनानिमित्त सीबीडी बेलापूर येथील रायगड भवनासमोरील मैदानावर वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांच्या हस्ते वृक्षारोपण कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. वृक्षारोपण कार्यक्रमांतर्गत करंजा या रोपांची लागवड करण्यात आली.**

# चिवणी मासळीला मागणी वाढली



**उरण : वार्ताहर**

रायगड जिल्ह्यात जोरदार पावसाला सुरुवात झाल्यामुळे वळगणीच्या माशांसाठी खवय्यांची धडपड सुरू झाली आहे. वळगणीच्या वेळेस समुद्रातील मासळी भरपूर पाऊस पडल्यास अंडी घालण्यासाठी खाडी किनारी येत असतात त्या वेळेस मासळी खूप प्रमाणत मिळते.

शेतकरी बांधवांकडून येथील जाळे टाकून मासे पकडले जात आहेत तसेच शेतामध्ये समुद्राचे पाणी शिरल्याने विविध पद्धतीने वळगणीचे मासे पकडून त्याच्यावर ताव मारला जात आहे.पावसाळ्यात या वळगणीच्या माशांना मोठी मागणी असते. त्यामुळे या माशांची चांगली विक्री होऊन मासेमारी करणाऱ्यांच्या हातात चांगले पैसे येतात.

या माशांना चवच भारी असे खवय्ये सांगत असतात. खाडीतील मासळीला अतिशय चवदार, लज्जतदार मासे म्हणजे चिवनी होय होय. रायगडमध्ये खवय्यांची पहिली पसंत म्हणजे चिवनी गाभोळीचे) मासे केगाव, दांडा, पाणजे, फुंडे, मुलेखंड, चिरनेर, खोपटा आदी ठिकाणी विक्री करणाऱ्या महिला टोपलीतून घेऊन येतातखाडीतील खुबे, चिवनी, बोईट, खेकडे अशा सर्व प्रकारची मासळी विकावयास सिडको फाटा येथे येत असतात. येथे फुंडे, डोंगरी, पाणजे येथून महिला मच्छी विकण्यास येत असतात.

पावसाळ्यांत खाडीतील मासे भरपूर प्रमाणत मिळत असतात चिवनी गाभोळी अंडी (गाभोळी) असलेली मासळीला खूप मागणी असते आम्ही ताजी मासळी सिडको फाटा येथे विकत असतो, अशी पाणजे गावातील मासे विक्रेती नूतन पाटील यांनी सांगितले.



**पनवेल : भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते वाकडी येथील नरेश पाटील यांच्या बंगल्याच्या कामाचे भूमिपूजन करण्यात आले. सोबत पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक.**



**पनवेल : जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भाजप पनवेल तालुका पूर्व मंडळाच्या वतीने वृक्षारोपणाचा उपक्रम राबवण्यात आला. या वेळी भाजप नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, महेश पाटील, सरपंच योगिता राजेश पाटील, राजेश पाटील, मच्छिंद्र पाटील, प्रमोद पोपेटा आदी उपस्थित होते.**

# पीक कर्जाची १०० टक्के उद्दिष्टपूर्ती करा

## जिल्हाधिकाऱ्यांचे बँकांना निर्देश; पतपुरवठा पुस्तिकेचे प्रकाशन

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील बँकांनी मार्च २५मध्ये संपलेल्या आर्थिक वर्षात प्राथमिकता क्षेत्रासाठी आठ हजार ८०० कोटींच्या वार्षिक पतपुरवठा आराखड्याचे उद्दिष्ट असताना बँकानी नऊ हजार ३४२ कोटी (१०६%) कर्ज वाटप झाल्याची माहिती देऊन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सर्वबँकांचे कौतुक केले. त्यांनी सर्व बँकांचा आणि सरकारी विभागांचा योग्य समन्वय असल्याने मोठे उदिष्ट ही साध्य करता येते. असाच समन्वय आणि परस्पर सहकार्य या आर्थिक वर्षातसुद्धा पुढे चालू ठेवावे, असे आवाहन केले.



जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय सल्लागार व आढावा समितीची बैठक जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात झाली. त्या वेळी ते बोलत होते. किसान क्रेडिट कार्डसाठी असणारे रू.६२५ कोटी उद्दिष्ट प्रत्येक सरकारी, खासगी आणि जिल्हा मध्यवर्ती बँकांनी १०० टक्के पूर्ण करा तसेच मत्स्य व्यवसाय आणि दुग्ध व्यवसाय अंतर्गत किसान क्रेडिट कार्ड देण्याला प्राधान्य द्या, असे सांगून बँकांनी व शासकीय अधिकाऱ्यांनी परस्पर समन्वय ठेवून नागरिकांना नियमित आणि चांगल्या पद्धतीने सेवा द्या. शासकीय योजनांतर्गत प्राप्त कर्ज प्रकरणे वेळेत मार्गी लावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

या बैठकीला रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा विकास यंत्रणांच्या प्रकल्पाधिकारी प्रियदर्शनी मोरे, बँक ऑफ इंडिया रायगड विभागाच्या विभाग प्रमुख दीपंविता सहानी भारतीय रिझर्व बँकच्या वित्तीय समावेशन आणि विकास विभागाचे व्यवस्थापक विशाल गोंडखे, नाबार्डचे जिल्हा प्रबंधक प्रदीप अपसुंदे, जिल्हा निबंधक प्रमोद जगताप, पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सचिन देशपांडे व जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक जी.एस. हरळय्या, माविमचे जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी, जिल्हा अग्रणी प्रबंधक विजयकुमार कुलकर्णी तसेच विविध विभाग व महामंडळाचे अधिकारी, बँकांचे जिल्हा समन्वयक, प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे पुढे म्हणाले, पीक कर्ज योजनेसह अन्य शासकीय योजनांतर्गत बँकांकडे प्राप्त कर्ज प्रकरणे वेळेत मार्गी लावावीत. तसेच सर्व शासकीय योजनांच्या कर्ज प्रकरणांची डिसेंबर अखेर उद्दिष्ट पूर्तता करावी. शासनाच्या आणि महामंडळांच्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील जास्तीत जास्त नागरिकांना मिळवून द्यावा. यासाठी बँकांनी वार्षिक पतपुरवठा आराखड्याबरोबरच शासकीय व महामंडळांच्या योजनांची उद्दिष्टपूर्ती होण्यासाठी परस्पर समन्वय ठेवून नियोजन करावे. तसेच कृषी व तत्सम क्षेत्र, लघु उद्योग क्षेत्र, प्राथमिक अप्राथमिक क्षेत्राची उद्दिष्टपूर्ती करावी. प्रधानमंत्री अन्न प्रक्रिया योजनांमध्ये लाभार्थ्यांना भरघोस लाभ देण्यात येतो. त्याअंतर्गत जास्तीत जास्त प्रकरणे होण्यासाठी कृषी विभागाने पुढाकार घ्यावा.

बँकानी ग्राहकांना बँकिग सुविधा पुरवण्याबरोबरच त्यांना आर्थिक दृष्ट्या साक्षर कण्यासाठी पुढाकर घ्यावा. यासाठी कर्ज मेलाव्याबरोबरच आर्थिक साक्षरतेचे नियोजन करावे. जास्त व्याज घेणाऱ्या संस्थांमधून कर्ज न घेता सरकारी बँकामधुन घ्यावे तसेच बनावट नोटा ओळखणे व नाण्यांच्या वापरा संबंधी जिल्ह्यात जनजागृती मिळावे आयोजित करण्यासाठी रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन जावळे यांनी ङ्गशले.

यावेळी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम, मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम यांचे १००%उदिष्ट पूर्ण केल्याबद्दल सर्व बँकांचे अभिनंदन केले. याबरोबर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळासह विविध महामंडळांच्या योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, बचत गटांना पतपुरवठा, पीएम स्वनिधी, स्टॅन्ड अप इंडिया, विश्वकर्मा योजना, कृषी पायाभूत विकास निधी आदी विषयांचा आढावा जिल्हाधिकारी जावळे यांनी घेतला.

यामध्ये जिल्ह्यातील खाजगी बँकांचे योगदान एकदम नगण्य असल्याचे निदर्शनात आल्याने जिल्ह्यातील खासगी बँकांना सज्ज्ड दम दिला आणि उद्दिष्ट पूर्ण करून जिल्ह्याचे विकासात योगदान देण्याचे निर्देश दिले. जिल्हा अग्रणी प्रबंधकाना खासगी बँकाच्या दर आठवड्याला आढावा घेण्याचे आणि तो रिपोर्ट जिल्हाधिकारी यांना सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले तसेच सर्व बँकांनी प्राथमिक कर्ज मंजुरी करताना रिझर्व्ह बँकेने आखून दिलेल्या निर्देशांचे पालन करावे आणि समाजातील आर्थिकदृष्ट्या मागास विभागास प्रथम प्राधान्य देण्याचे निर्देश दिले.

या वेळी कृषी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, विविध महामंडळांचे जिल्हा समन्वयक, आरसेटी आदी विभागांसह बँकांच्या जिल्हा समन्वयकांनी दिलेले उद्दिष्ट व मार्च २०२५अखेर झालेल्या उद्दिष्टपूर्तीबाबत माहिती दिली.

### आर्थिक वर्षात ७३४ कोटींच्या मुद्रा लोनचे वाटप

आर्थिक वर्ष २०२५मध्ये जिल्ह्याला कृषी क्षेत्रासाठी एक हजार ७५० कोटी रुपयांचे उद्दिष्ट असताना बँकांनी दोन हजार ६५ कोटी (११८%); सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगासाठी ५१०० कोटी उद्दिष्ट असताना ५३४७ (१०५%), तर पीक कर्जासाठी ४५० कोटी उद्दिष्ट असताना ४०० कोटी (८९ %) साध्य केले असल्याचे सांगून जिल्हा अग्रणी बँक असलेल्या बँक ऑफ इंडियाचे व्यवस्थापक विजय कुलकर्णी यांनी मुद्रा अंतर्गत जिल्ह्यात ७३४ कोटी रुपये कर्ज वाटप करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# 'माथेरानची राणी' पावसाळी सुट्टीवर

## माथेरान-अमन लॉज शटल सेवा राहणार सुरू

**रोहा : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेने पावसाळ्यात दिनांक ०१.०६.२०२५ ते दिनांक १५.१०.२०२५पर्यंत नेरळ-माथेरान नॅरो गेज मार्गाच्या नेरळ-अमन लॉज विभागादरम्यान नियमित प्रवासी सेवा स्थगित केल्या आहेत. तथापि, या कालावधीत माथेरान-अमन लॉजदरम्यान शटल सेवा विशिष्ट वेळेत चालवल्या जाणार आहे.

**माथेरान-अमन लॉज शटल सेवा** (दैनंदिन)

५२१५४ माथेरान येथून प्रस्थान ०८.२० वाजता होईल आणि अमन लॉज येथे आगमन ०८.३८ होईल, ५२१५६ माथेरान येथून प्रस्थान ०९.१० वाजता होईल आणि अमन लॉज येथे आगमन ०९.२८ वाजता होईल, ५२१५८ माथेरान येथून प्रस्थान ११.३५ वाजता होईल आणि अमन लॉज येथे आगमन ११.५३ वाजता होईल, ५२१६० माथेरान येथून प्रस्थान १४.०० वाजता होईल आणि अमन लॉज येथे आगमन १४.१८ वाजता होईल, ५२१६२ माथेरान येथून प्रस्थान १५.१५ वाजता होईल आणि अमन लॉज येथे आगमन १५.३३ वाजता होईल, ५२१६४ माथेरान येथून प्रस्थान १७.२० वाजता होईल आणि अमन लॉज येथे आगमन १७.३८ वाजता होईल.

**शनिवार व रविवार विशेष-२**

माथेरान येथून प्रस्थान १०.०५ वाजता होईल आणि अमन लॉज येथे आगमन १०.२३ वाजता होईल. विशेष-४ : माथेरान येथून प्रस्थान १३.१० वाजता होईल आणि अमन लॉज येथे आगमन १३.२८ वाजता होईल.

**अमन लॉज-माथेरान शटल सेवा** (दैनंदिन)

५२१५३ अमन लॉज येथून प्रस्थान ०८.४५ वाजता होईल आणि माथेरान येथे आगमन ०९.०३ वाजता होईल,५२१५५ अमन लॉज येथून प्रस्थान ०९.३५ वाजता होईल आणि माथेरान येथे आगमन ०९.५३ वाजता होईल, ५२१५७ अमन लॉज येथून प्रस्थान १२.०० वाजता होईल आणि माथेरान येथे आगमन १२.१८ वाजता होईल, ५२१५९ अमन लॉज येथून प्रस्थान १४.२५ वाजता होईल आणि माथेरान येथे आगमन १४.४३ वाजता होईल, ५२१६१ अमन लॉज येथून प्रस्थान १५.४० वाजता होईल आणि माथेरान येथे आगमन १५.५८ वाजता होईल, ५२१६३ अमन लॉज येथून प्रस्थान १७.४५ वाजता होईल आणि माथेरान येथे आगमन १८.०३ वाजता होईल.

**शनिवार, रविवार विशेष-१**

अमन लॉज येथून प्रस्थान १०.३० वाजता होईल आणि माथेरान येथे आगमन १०.४८ वाजता होईल, विशेष-३: अमन लॉज येथून प्रस्थान १३.३५ वाजता होईल माथेरान येथे आगमन १३.५३ वाजता होईल. सर्व शटल सेवा ३ द्वितीय श्रेणी, एक प्रथम श्रेणी कोच आणि २ द्वितीय श्रेणी कम लगेज व्हॅनसह चालतील.

प्रवाशांनी कृपया बदल लक्षात घ्यावेत आणि शटल सेवा सुविधेचा लाभ घ्यावा, अशी विनंती रेल्वे प्रशासनाकडून करण्यात येत आहे.

# कशेणे हद्दीत कारच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

## कारमधील एकजण जखमी

**माणगाव : प्रतिनिधी**

मुंबई-गोवा हायवेवर माणगाव तालुक्यातील इंदापूर येथील कशेणे गावच्या हद्दीत कार व दुचाकीचा अपघात झाला असून या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार बुधवार दि. ४ जून रोजी सायंकाळी ४.१० वा. सुमारास कशेणे गावच्या हददीमध्ये विवेक सिताराम सापळे (वय ६०, रा. विघवली, ता. माणगाव) हे त्यांचे ताब्यातील हिरो मॅस्ट्रो स्कुटी (एमएच ०६ बीएल ४४९१) वरुन मुठवली तर्फे तळे येथून विघवली येथे घरी परत येत असताना माणगाव बाजूकडून मुंबई बाजुकडे जाणा-या मारुती एसक्रॉस गाडीने (एमएच ४७ के ७६२२)वरील चालक अभिजीत गजानन सुतार (वय २५, रा. शिरखळ सुतारवाडी, ता. दापोली, जि. रत्नागिरी) याने आपल्या ताब्यातील गाडी अतिवेगाने, रॉंग साईडने चालवून विवेक सापळे यांचे ताब्यातील स्कुटीला समोरुन धडक देऊन व त्यांना लहान मोठ्या स्वरुपाच्या दुखापती करून त्यांचे मरणास तसेच एसक्रॉस गाडीमधील सचिन दिलीप पिंपळकर यांचे लहान स्वरुपाचे दुखापतीस कारणीभूत असून आरोपी विरुद्ध माणगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार फडताडे करीत आहेत.

# दहावी, बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा गौरव



**माणगाव : बातमीदार**

बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक पाच या खरवली विभागातील महाराष्ट्र राज्य शालांत माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षा यशस्वीरित्या उत्तीर्ण झालेल्या इयत्ता दहावी व बारावी विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष त्यांच्या घरी जाऊन शाखेचे अध्यक्ष विवेक तुकाराम जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या पदाधिकारी समवेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा व पालकांचा गौरव करण्यात आला.


दहावी उत्तीर्ण विद्यार्थी सानिका सचिन जाधव, स्वयंम उमेश कासारे, साक्षी मिलिंद गायकवाड, सारा संदेश कासारे, अंतरा संदीप पवार, रिया विलास मोहिते, सक्षम मनोहर कासारे, रणजीत मोहिते, सावली उपेंद्र सोनवणे, तर बारावी उत्तीर्ण विद्यार्थी स्नेहा विवेक जाधव, आर्यन सचिन जाधव, सक्षम प्रशांत मोहिते, प्रेम उपेंद्र सोनवणे, प्रज्योती प्रमोद सकपाळ, आर्यन सुदर्शन जाधव या यशस्वी विद्यार्थ्यांचे शाखा क्रमांक पाचच्या विद्यमाने अभिनंदन करून व उपस्थित मान्यवरांनी शैक्षणिक मार्गदर्शन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस मनपूर्वक शुभेच्छा दिल्या.

या वेळी शाखेचे चिटणीस अमोल मोहिते, उपचिटणीस नंदू कांबळे, ऑडिटर संतोष मोरे, संदेश वाहक संदेश कासारे, ज्येष्ठ सभासद प्रकाश जाधव, उमेश कासारे, संतोष जाधव, संदीप पवार, मिलिंद गायकवाड या मान्यवरांसह पालकवर्ग व शुभचिंतक बहुसंख्येने उपस्थित होते.

# बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर हाळ गावात पोलिसांचा रूट मार्च

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस स्टेशन हद्दीतील तिन्ही हाळ गावात वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या नेतृत्वाखाली आगामी बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर रूट मार्च काढण्यात आला.



आगामी ईद सणाच्या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये, खालापूर पोलीस यंत्रणा सज्ज असून महड फाटा,जामा मस्जिद, हाळ खुर्द गाव, हूसेनिया मस्जिद, ग्रामपंचायत कार्यालय ते अंजारून फाटा असा रूट मार्च केल्यावर मधला हाळ फाटा, जामा मस्जिद, मधला हाळ गाव ते हाळ फाटा असा रूट मार्च करून तिसरा हाळ कॅफे सागर हॉटेल, मिळत नगर, बौद्धवाडी, बुद्रुक जामा मस्जिद ते हाळ बुद्रुक फाटा असा रूट मार्च करण्यात आला. खालापूर पोलीस ठाणे हद्दीत आगामी सण बकरी ईद अनुषंगाने रूट मार्च घेण्यात आलेला असून

काही दिवसांपूर्वी येथे अनुचित प्रकार घडत असल्याची माहिती मिळाली होती. खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांच्या मुळे पुढील अनर्थ टळला होता. या वेळी ग्रामस्थांनी सहकार्य केले. पोलीस निरीक्षक खालापूर सचिन पवार, आरएसपी वडखळ व खालापूर पोलिस ठाणेकडील चार अधिकारी व १७ अंमलदार हजर होते.

# चौक येथे ९ जूनला मोफत शासकीय दाखल्यांसाठी शिबिर

**चौक : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन महसूल व वन विभाग तथा कार्यकारी दंडाधिकारी कार्यालय खालापूर आणि आमदार महेश बालदी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत दाखल्यासाठी चौक येथे ९ जून रोजी शिबिर आयोजित करण्यात आले असून याचा लाभ घ्यावा, असे आवाहन खालापूर तहसील कार्यालय यांच्याकडून करण्यात आले आहे.

गटविकास अधिकारी पंचायत समिती खालापूर,तालुका कृषि अधिकारी, खालापूर यांनी प्रशासनामार्फत दिल्या जाणाऱ्या सुविधा जनतेस स्टॉल लावून उपलब्ध करुन देण्याबाबतदेखील सूचना देण्यात आल्या आहेत.

आमदार महेश बालदी यांनी तसे पत्र प्रशासनास दिले आहे. खालापूर तालुक्यातील शाळेतील मुलांना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ अंतर्गत सर्व प्रकारचे दाखले मिळणे साठी महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान व पारदर्शक करणे यासाठी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या कालावधीत सुरु झाले आहे. सर्व सामान्य जनतेस शैक्षणीक व अन्य शासकीय सुविधा साठी विविध स्वरुपाच्या दाखल्यांची आवश्यकता असते. यासंबंधी प्रक्रीया सुकर करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना लागणाऱ्या प्रमाणपत्र जनतेच्या सोईच्या मध्य ठिकाणी विशेष शिबीरे आयोजित करुन दाखल्यांकरीता आवश्यक ते अर्ज व कागदपत्रे या बाबत जनतेस माहिती देणे कामी व त्याच ठिकाणी अर्ज भरुन घेऊन हनुमान मंदीर चौक येथे सोमवार दि. ९ जून रोजी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास दाखला, रहिवास दाखला, नॉन क्रिमीलेअर दाखला, जेष्ठ नागरिक, संजय गांधी निराधर योजना, एथड प्रमाणपत्र, स्थानिक वास्तव्याचा दाखला, भोगवटदार वर्ग २चे वर्ग १ करणे, ४० पट नजराना भरणे इ. सुविधा मिळणार आहे

जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी दिलेल्या सुचनांनुसार खालापूर तालुक्यामध्ये आयुष्यमान भारत कार्ड काढणाऱ्या नागरीकांची संख्या खुप कमी प्रमाणात असल्याने आयुष्यमान भारत कार्डची संख्या वाढविणे आवश्यक आहे.त्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी यांना सूचना देण्यात आल्या असल्याचे निवासी नायब तहसीलदार खालापूर सुधाकर राठोड यांनी सांगितले.

# अलिबाग येथील मुलींच्या शासकीय वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू

**रायगड : रामप्रहर वृत्त**

सामाजिक न्याय विभागांतर्गत मागासवर्गीय विद्यार्थिनींकरिता मागासवर्गीय व आर्थिकदृष्ट्या मागास मुलींचे शासकीय वसतिगृह, दिव्या अपार्टमेंट, यामाहा शोरुम, आर.सी.एफ.गेटसमोर, वेश्वी अलिबाग येथे कार्यरत आहे.


या वसतिगृहामध्ये इ.८ वी पासून गरीब, हुशार, होतकरू, मागासवर्गीय अनु. जाती, अनु.जमाती , विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रवर्ग,आर्थिकदृष्या मागास, अनाथ व अपंग यांना गुणवत्तेनसार प्रवेश दिला जातो. वसतिगृहात विद्यार्थीनीकरिता मोफत निवासव्यवस्था असून नाष्टा-दररोज पोहे/शिरा/उपीट इ. पैकी एक, उकडलेली दोन अंडी, सफरचंद, ऋतुमानानुसार एक फळ व दुध तसेच भोजन व्यवस्थेमध्ये जेवण (डाळ, भात, चपाती, भाजी/उसळ, लोणचे पापड इ.सह आठवड्यातून दोन वेळा मांसाहार) देण्यात येते.

अभ्यासाकरिता लागणारी वह्या, पुस्तके शैक्षणिक व लेखन साहित्य देखील विनामूल्य पुरविले जाते. तसेच दैनंदिन व वैयक्तिक खर्चाकरिता म्हणून दरमहा रू.६००/- निर्वाहभत्ता दिला जातो. शालेय व गणवेश पात्र महा.विद्यार्थीनींना दोन संचाकरिता गणवेश भत्ता/रेनकोट/छत्री भत्ता दिला जातो. या व्यतिरिक्त रेनकोट, छत्री भत्ता, संगणक, ग्रंथालय सुविधा, क्रिडा साहित्य,मनोरंजन इ. अनेक सुविधा उपलब्ध आहेत.

प्रवेशपात्र विद्यार्थीनींच्या पालकांचे सर्व मार्गांनी मिळून वार्षिक उत्पन्न अनु.जाती, अनु.जमाती विद्यार्थीनींकरिता रूपये २ लाख ५० हजारचे आत व विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष विद्यार्थीनींकरिता रू.१ लाखाचे आत असावे.

ऑफलाईन प्रवेश अर्जासोबत तहसिलदार यांच्या सहीचा सन २०२५-२६ मधील उत्पन्नाचा दाखला, जातीचे मुलकी अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र, मागील इयत्ता पास झाल्याचे गुणपत्रक,आधारकार्ड, शाळा/कॉलेजचे बोनाफाईड या कागदपत्रांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहेत.

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाकरिता वसतिगृह प्रवेश अर्ज हे वसतिगृहात उपलब्ध करण्यात आले आहेत. अधिक माहितीकरिता गृहपाल, मागासवर्गीय व आर्थिकदृष्टया मागास मुलींचे शासकीय वसतिगृह,अलिबाग सौ.यु. एस.गुजेला (मो.८७६७३३९९७४) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन गृहपाल सौ.यु.एस.गुजेला यांनी केले आहे.



**श्रीवर्धन : कांदळवनाने समृद्ध असलेला श्रीवर्धनचा नयनरम्य परिसर पर्यटकांना भुरळ घालतो.** (छाया : अमेय नाझरे)

# पहिल्या कसोटीसाठी इंग्लंडचा संघ जाहीर

## भारताविरुद्ध लढतीसाठी जेमी ओव्हरटनला संधी



**लंडन : वृत्तसंस्था**

भारत आणि इंग्लंड या दोन्ही संघांमध्ये पाच कसोटी सामन्यांची मालिका रंगणार आहे. या मालिकेतील पहिला कसोटी सामना २० जूनपासून खेळवला जाईल. या सामन्यासाठी इंग्लंडचा संघ जाहीर करण्यात आला आहे.

हेडिंग्लेमध्ये होणाऱ्या या सामन्यासाठी स्टार अष्टपैलू खेळाडू जेमी ओव्हरटनला संघात स्थान देण्यात आले आहे. हा खेळाडू तीन वर्षांनंतर संघात कमबॅक करणार आहे. त्याने २०२२ न्यूझीलंडविरूद्ध झालेल्या कसोटी मालिकेतून पदार्पण केले होते. त्यानंतर पहिल्यांदाच त्याची इंग्लंडच्या कसोटी संघात निवड करण्यात आली आहे.

यासह वेगवान गोलंदाज ब्रायडन कार्स,ख्रिस वोक्सला देखील या संघात स्थान देण्यात आले आहे. हे दोघेही डिसेंबरमध्ये झालेल्या कसोटी मालिकेत शेवटचा कसोटी सामना खेळताना दिसून आले होते.

दरम्यान, इंग्लंडविरूद्ध होणाऱ्या मालिकेआधी भारतीय संघात मोठे बदल झाले आहेत. भारताचा माजी कर्णधार रोहित शर्मा तसेच विराट कोहलीनेदेखील कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा केली आहे. रोहितच्या जागी युवा फलंदाज शुबमन गिलची भारतीय संघाचा कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे, तर साई सुदर्शन आणि करूण नायर यांना संघात स्थान देण्यात आले आहे.

**पहिल्या सामन्यासाठी**
**इंग्लंडचा संघ :** बेन स्टोक्स (कर्णधार), शोएब बशीर, जेकब बेथेल, हॅरी ब्रूक, ब्राडन कार्स, सॅम कुक, जॅक क्रॉली, बेन डकेट, जेमी ओव्हरटन, ओली पोप,जो रूट, जेमी स्मिथ, जोश टंग, ख्रिस वोक्स.

**मालिकेचे वेळापत्रक**
पहिली कसोटी : २० ते २४ जून–हेडिंग्ले, लीड्स
दुसरी कसोटी : २ ते ६ जुलै–एजबॅस्टन, बर्मिंगहॅम
तिसरी कसोटी : १० ते १४ जुलै–लॉर्ड्स, लंडन
चौथी कसोटी : २३ ते २७ जुलै–ओल्ड ट्रॅफर्ड, मँचेस्टर
पाचवी कसोटी : ३१ जुलै ते ४ ऑगस्ट–द ओव्हल, लंडन




# परी महाडीकचा 'सुवर्ण'पंच

## जागतिक मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिपसाठी निवड

**रोहा : प्रतिनिधी**

नेपाळमधील काठमांडू येथे झालेल्या पहिल्या आशियायी मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत रोह्यातील परी रूपेश महाडीक हिने सुवर्णपदक पटकाविले.

पहिल्या आशियायी मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत परी हिने भारताचे नेतृत्व करून सुवर्णपदक प्राप्त करून देशाचे, राज्याचे, जिल्ह्याचे, तालुक्याचे व आई–वडिलांचे नाव उज्ज्वल केले आहे. परीची इंग्लंडमध्ये होणाऱ्या जागतिक मिक्स बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी निवड झाली आहे. याबद्दल परीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

परी ही रोहा अंधार आळी येथे राहत असून तिचे मूळ गाव सर्वे (ता. मुरूड) आहे. तिला प्रशिक्षक विनायक सकपाळ व राकेश म्हसकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# अंतरा घाडगेला मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत रौप्यपदक


**मुरूड : प्रतिनिधी**

नेपाळ येथे झालेल्या आशियाई मिक्स बॉक्सिंग स्पर्धेत रोहा तालुक्यातील खारेगाव येथील अंतरा आकाश घाडगे हिने रौप्यपदक प्राप्त केले.

अंतरा ही रोहा येथील मेहेंदळे हायस्कूलमधील इयत्ता नववीच्या वर्गात शिकत असून तिचे वडील आकाश घाडगे हे एलआयसी एजंट, तर आई राजश्री घाडगे नांदगावच्या श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयात सहाय्यक शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत. अंतराच्या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.



# शब्दच नाही, अस्वस्थ झालोय!



## चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेवर विराट कोहली भावूक

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

तब्बल १८ वर्षांनी रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू टीमने आयपीएल विजेतेपदाचा किताब पटकावला. आरसीबीच्या या विजयामुळे कर्नाटकात मोठा जल्लोष करण्यात आला, मात्र या विजयी सोहळ्याला दु:खाची किनार लागली. बंगळुरूत झालेल्या चेंगराचेंगरीत ११ चाहत्यांचा मृत्यू झाला, तर ३०हून अधिक जखमी झालेत. या दुर्घटनेवर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत.

दरम्यान, बंगळुरूतील चेंगराचेंगरीच्या दुर्घटनेवर आरसीबी खेळाडू विराट कोहलीने त्याच्या भावना व्यक्त केल्यात. त्यात शब्दच नाही, अस्वस्थ झाल्याचे त्याने म्हटले आहे. या पोस्टसह विराटने रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू या फ्रेंचायसीकडून आलेले निवेदन शेअर केले आहे.

या निवेदनात घडलेली घटना अतिशय दु:खद असून सर्व लोकांच्या सुरक्षेला आमचे प्राधान्य असल्याचे म्हटलेय तसेच बंगळुरूत टीमचे आगमन झाले तेव्हा मोठ्या संख्येने जनता तिथे आली, मात्र तेव्हा घडलेली दुर्घटना अत्यंत दु:खद आहे. मृत लोकांबद्दल आम्ही शोक व्यक्त करतो आणि पीडित कुटुंबांना आमच्या मनापासून संवेदना व्यक्त करतो, असे त्यांनी सांगितले. याशिवाय जेव्हा आम्हाला ही दुर्घटना कळली तेव्हा तातडीने आम्ही आमच्या कार्यक्रमात बदल केला. स्थानिक प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन केले, असेही आरसीबी टीम प्रशासनाने स्पष्ट केले.

दरम्यान, चिन्नास्वामी मैदानाबाहेर मोठ्या संख्येने लोकांची गर्दी झाली. ही गर्दी नियंत्रणात आणण्यात पोलिसांना अपयश आले. त्या वेळी झालेल्या चेंगराचेंगरीत ११ लोकांचा मृत्यू झाला. ३३ लोकांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.



**पनवेल :** रायगड जिल्ह्याचे भाग्यविधाते माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा वाढदिवस नुकताच साजरा झाला. याबद्दल पनवेल विधानसभेतील उत्तराखंड समाज बांधावांनी तसेच इतर मान्यवरांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पुष्पगुच्छ देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे कळंबोली मंडळ सरचिटणीस दिलीप बिष्ट, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, ज्ञानसिंग बिष्ट, धीरज गोसाई, मोहन जोशी, सुरेश पुरोहित, ज्योती पोखरीयल, लक्ष्मी किमोठी यांच्यासह इतर उपस्थित होते.







**पनवेल :** महापालिकेच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्ताने गुरुवारी वडाळे तलावाजवळील महामार्गालगत आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदींच्या उपस्थितीत सुमारे ४० रोपांची लागवड करण्यात आली तसेच कापडी पिशवी विक्री केंद्र आणि पुनर्वापर प्लास्टिक व ई–वेस्ट संकलन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमास माजी नगरसेवक–नगरसेविका, महापालिका अधिकारी, महावीर इंटरनॅशनल संस्थेचे पदाधिकारी, निसर्गमित्र संस्थेचे पदाधिकारी, नागरिक उपस्थित होते.










दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com